## ‘शिवरायांच्या विचारांवर चालणाऱ्या महायुतीला विजयी करा’



**जळगाव :** ओबीसी आणि दलितांचे आरक्षण कमी करून ते मुस्लिमांना देण्याचा घाट महाविकास आघाडीने घातला आहे. म्हणूनच काँग्रेसने आपल्या जाहीरनाम्यात मुस्लिमांना १० टक्के आरक्षण देण्याची घोषणा केली आहे. आरक्षणाची मर्यादा ही ५० टक्क्यांपेक्षा जास्त होऊ शकत नाही. त्यामुळे ओबीसी आणि दलितांचे आरक्षण कमी करून ते मुस्लिमांना देण्याचा त्यांचा प्रयत्न असल्याचा आरोप केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी रविवारी (दि. १०) महाविकास आघाडीवर केला. जळगाव येथे महायुती उमेदवारांच्या प्रचार सभेतून ते बोलत होते. आजच्या दिवशी शिवाजी महाराजांनी अफजल खानाचा वध केला होता. महाराष्ट्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांवर चालणाऱ्या महायुती सरकारला विजयी करा. महाराष्ट्राला देशातील एक नंबर राज्य बनविण्याचे आमचे स्वप्न आहे, असेही ते म्हणाले.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक ११५
www.ramprahar.com

सोमवार, ११ नोव्हेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


## अंतरंग


सामूहिक प्रतिज्ञा घेत मतदानाचा निर्धार/२

रायगड जिल्ह्यात रंगतदार लढती/४

भारतीय संघ पाकिस्तान दौऱ्यावर जाणार नाही!/८


# भाजपचे संकल्पपत्र प्रसिद्ध

## शेतकऱ्यांना कर्जमाफी, २५ लाख नव्या नोकऱ्या देणार

### महिलांना दरमहा २१०० रुपये देण्याचेही आश्वासन

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने आपला जाहीरनामा (संकल्पपत्र) रविवारी (दि. १०) केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रसिद्ध केला. शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी व भावांतर योजना, २५ लाख नोकऱ्या, महिलांना २१०० रुपये आणि महाराष्ट्राचा संपूण विकास करण्याचा संकल्प आम्ही केला आहे, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वेळी सांगितले.


संकल्पपत्र प्रकाशनावेळी केंद्रीय मंत्री पियुष गोयल, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजप नेते सुधीर मुनगंटीवार, रावसाहेब दानवे, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, मुंबई अध्यक्ष आशिष शेलार यांचीही उपस्थिती होती.

भाजपच्या संकल्पपत्रानुसार शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि शेतकरी सन्मान योजनेतून वर्षाला १२ हजारवरून १५ हजार रुपये तसेच एमएसपीशी समन्वय साधत २० टक्क्यांपर्यंत भावांतर योजना राबविण्यात येईल.

लाडक्या बहिणींना प्रत्येक महिन्याला १५०० रुपयांवरून २१०० रुपयांपर्यंत देण्यात येतील तसेच या योजनेचे औचित्य साधून महिलांमध्ये आर्थिक साक्षरता निर्माण करण्यासाठी प्रशिक्षण दिले जाईल. महिला सुरक्षेसाठी २५ हजार महिलांचा पोलीस दलात समावेश करण्यात येईल.

येणाऱ्या काळात २५ लाख रोजगार निर्मिती तसेच महिन्याला १० लाख विद्यार्थ्यांना १० हजार रुपये विद्यावेतन देण्यात येईल. वृद्ध पेन्शनधारकांना महिन्याला १५०० रुपयांवरून २१०० रुपये देण्यात येतील, जेणेकरून संपूर्ण महाराष्ट्रात ज्येष्ठ नागरिकांना अधिक आर्थिक सुरक्षा आणि सन्मान मिळेल. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील सर्व कुटुंबांना बाजारातील उतार-चढावांपासून सुरक्षित करण्यासाठी राज्यात जीवनावश्यक वस्तूंच्या किमती स्थिर ठेवण्यात येतील, असे संकल्पपत्रात नमूद करण्यात आले आहे.

राज्यातील ग्रामीण भागात ४५ हजार गावांमध्ये पांधण रस्ते बांधण्यात येतील. अंगणवाडी आणि आशा सेविकांची आर्थिक सुरक्षा तसेच कल्याण सुनिश्चित करण्यासाठी महिन्याला १५ हजार रुपये वेतन आणि विमा संरक्षण देण्यात येईल. वीज बिलात ३०% कपात करून सौर आणि अक्षय ऊर्जेवर भर देण्यात येईल. सरकार स्थापनेनंतर १०० दिवसांच्या आत’ व्हिजन महाराष्ट्र २०२९’ सादर करण्यात येईल. सन २०२८पर्यंत महाराष्ट्राला एक ट्रिलियन अर्थव्यवस्था बनविण्याचे लक्ष्य ठेवले आहे, असेही संकल्पपत्रात नमूद करण्यात आले आहे.



### विकसित भारतासाठी विकसित महाराष्ट्र!

जाहीरनाम्यात भाजपने शेतकऱ्यांसाठी मोठ्या योजना आणि महिलांसाठी आर्थिक सहाय्याची हमी दिली आहे. त्याचप्रमाणे विविध क्षेत्र आणि घटकांसाठी काय काय करणार हे सांगण्यात आले आहे. भाजपचे हे संकल्पपत्र म्हणजे विकसित भारतासाठी विकसित महाराष्ट्र साकारण्याचा रोडमॅप असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. २०१९मध्ये दिलेल्या आश्वासनांप्रमाणेच या जाहीरनाम्यातील सर्व बाबींची अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# आमदार महेश बालदी ४० हजारांहून अधिक मताधिक्याने विजयी होतील

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा उलवे नोडमधील सभेत विश्वास

**उरण : प्रतिनिधी**

आमदार महेश बालदी यांचे काम फार मोठे आहे. त्यांच्यासारखा आमदार उरणला लाभला ही भाग्याची गोष्ट आहे. केंद्रापासून राज्यापर्यंत त्यांचे वजन आहे. शेकापच्या पुढाऱ्यांनी निवडणूक लढविणाऱ्यांना मामा बनवून विधानसभा रिंगणात उतरवले आहे. त्यामुळे आमदार महेश बालदी हे ४० हजारांहून अधिक मताधिक्याने विजयी होतील, असा विश्वास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी व्यक्त केला. ते महायुतीचे उमेदवार आमदार महेश बालदी यांच्या प्रचारार्थ शनिवारी (दि. ९) उलवे नोड येथे आयोजित सभेत बोलत होते.

उरणमध्ये विकासाची गंगा आमदार महेश बालदी यांनी आणली. प्रचंड विकासकामे आमदार महेश बालदी आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी उरण, पनवेल मतदारसंघात केली आहेत. जात, पात, धर्म बाजूला ठेवून आपण काम केले पाहिजे. तरीही उपरा इकडून आला, तिकडून आला म्हणणाऱ्यांना लाज कशी वाटत नाही, असा हल्लाबोल लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विरोधकांवर केला.

महायुतीचे उमेदवार आमदार महेश बालदी आपल्या भाषणात म्हणाले की, करंजा बंदरातून कोट्यवधी रुपयांची मासळी निर्यात केली जाते. त्याचा फायदा येथील मच्छिमारांना मिळत आहे. इर्शाळवाडीतील आदिवासी बंधू-भगिनींना घरे देण्याचे कार्य आपल्या सरकारने केले. बाकी राहिलेल्या आदिवासींनाही पक्की घरे देणार असून यापुढे आदिवासी कुडाच्या घरात राहणार नाही.



लोकांच्या सुरक्षेसाठी उलवे नोड पोलीस ठाणे सुरू केले. आता येथील खंडणीची दुकाने बंद करणार असल्याचे आमदार महेश बालदी यांनी स्पष्ट करून आपल्याला राज्य पुढे न्यायचे आहे. आपण विकासावर बोलतो. त्यामुळे विरोधकांना टीकेसाठी मुद्दा शिल्लक नाही. यंदाचे विकास पुस्तक सहा हजार कोटींच्या कामांचे आहे. पुढील पुस्तक १० हजार कोटींच्या कामांचे असेल, असा दावा केला.

सत्तेत असताना ज्यांनी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्याऐवजी स्वतःच्या वडिलांचे नाव देण्याचा घाट घातला होता त्या उबाठा सेनेने भाजप ‘दिबां’च्या नावाविरुद्ध असल्याचा कांगावा करणे म्हणजे चोरांच्या उलट्या बोंबा आहेत. (पान २ वर..)

### विरोधकांनी जातीपातीपेक्षा विकासाबद्दल बोलावे –आमदार महेश बालदी

महायुतीचे उमेदवार आमदार महेश बालदी म्हणाले, मतदारसंघात सहा हजार कोटी रुपयांची विकासकामे केली. म्हणूनच केलेल्या कामांची पुस्तके छापलीत. विरोधकांनी काय विकास केलाय? तर सांगणार. मी कधीच जाती-धर्माचा अवमान केला नाही. त्यामुळे माफी मागण्याचा प्रश्नच येत नाही. मोर्चे काढा, आणखी काय करा. चुकलो असेल तर शंभर वेळा काय हजारदा माफी मागेन, मात्र चुकलो नाही तर कोणालाही घाबरणार नाही. विरोधकांनी जातीपातीपेक्षा विकासाबद्दल बोलावे. आपली स्पर्धा जनतेच्या उन्नतीसाठी असली पाहिजे. आगरी, कोळी, कराडी सर्व समाजाची माणसे मला निवडून देतात. यंदा तर २५ हजार मते लाडक्या बहिणीच देतील.

## निवडक

### महाविकास आघाडीचा जाहीरनामा प्रसिद्ध

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीसाठी भाजपपाठोपाठ महाविकास आघाडीचा जाहीरनामा काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी (दि. १०) प्रसिद्ध करण्यात आला. या जाहीरनाम्यात लाडकी बहीण योजनेतून महिलांना तीन हजार मानधन तसेच सुशिक्षित बेरोजगारांना चार हजार मासिक मानधन देण्याचे आश्वासन तसेच शेतकऱ्यांना तीन लाखांपर्यंत कर्जमाफी देण्यात येणार असून नियमित कर्जफेड करणाऱ्यास ५० हजारांची सूट देण्यात येईल, असे म्हटले आहे.

### बाबा सिद्दीकी हत्येप्रकरणी फरार शूटर शिवकुमारला अटक

**मुंबई :** माजी मंत्री बाबा सिद्दिकी यांच्या हत्येप्रकरणी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेला मोठे यश मिळाले आहे. फरार असलेला शूटर शिवकुमारला अखेर अटक करण्यात आली आहे. मुंबई गुन्हे शाखेने उत्तर प्रदेशातून शिवकुमारला बेड्या ठोकल्या. मुंबई गुन्हे शाखा आणि उत्तर प्रदेश एसटीएफ यांनी ही संयुक्त कारवाई केली. शिवकुमारसह दोघा जणांना उत्तर प्रदेशच्या बेहाराईच येथून अटक करण्यात आली आहे.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विजयात चर्मकार समाज खारीचा वाटा उचलणार –शिवदास कांबळे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सर्व गटई कामगार महायुतीचे पनवेल विधानसभा मतदारसंघातील उमेदवार व कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पाठीशी ठामपणे उभे असून त्यांच्या विजयात चर्मकार समाज खारीचा वाटा उचलेल, अशी ग्वाही राष्ट्रवादी काँग्रेस आणि चर्मकार समाजाचे नेते शिवदास कांबळे यांनी दिली. शिवदास कांबळे यांच्या पुढाकाराने चर्मकार समाजातील गटई कामगारांनी आमदार प्रशांत ठाकूर यांना जाहीर पाठिंबा दिला. त्या वेळी



झालेल्या बैठकीत ते बोलत होते.

या बैठकीस भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, पीआरपी व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार आणि लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, कामगारनेते व प्रदेश उपाध्यक्ष महेश जाधव, जगदीश ठाकूर, युवक अध्यक्ष श्री. नेरूळकर, भाजपचे शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी नगराध्यक्ष सुनील मोहोड, माजी नगरसेवक सुनील नाईक, श्री. कारंडे यांच्यासह इतर पदाधिकारी आणि गटई कामगार उपस्थित होते.

शिवदास कांबळे यांनी पुढे बोलताना सांगितले की, चर्मकार समाजाच्या उन्नतीसाठी सरकार काम करीत आहे. त्या अनुषंगाने विविध योजना प्रत्येक कामगाराला मिळाली पाहिजे यासाठी आपण कायम प्रयत्नशील राहिलो आहोत. लोकप्रतिनिधी म्हणून आमदार प्रशांत ठाकूर हे सातत्याने लोकांच्या हिताचे काम करीत असतात. त्यामुळे त्यांना सर्व कामगारांचा पाठिंबा असल्याचेही त्यांनी नमूद केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्यघटनेचे शिल्पकार आहेत. त्यांनी दिलेल्या संविधानाची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पूजा करून ते लोकशाहीच्या मंदिरात नतमस्तक झाले होते. (पान २ वर..)

## पंतप्रधान नरेंद्र मोदींमुळे संविधान दिन : आमदार प्रशांत ठाकूर

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी पाठिंबा दिल्याबद्दल आभार मानले. रोहिदास चर्मकार समाज देशभर पसरलेला असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या समाजाचे कौतुक केले आहे. देशाशी एकरूप असलेल्या या समाजाचा देशाच्या योगदानात वाटा आहे. सबका साथ, सबका विकास आणि सबका विश्वास या पंतप्रधान मोदींच्या आत्मविश्वासाने काम होत आहे. सरकार संविधानाच्या विरोधात आहे असा खोटा प्रचार व दिशाभूल करण्याचे काम विरोधक करत असतात, मात्र सर्वप्रथम २६ नोव्हेंबर २०१५ हा दिवस पंतप्रधान मोदींमुळे संविधान दिन झाला आहे, असे ते म्हणाले.



# राज्यात पुन्हा युतीचे सरकार येईल -राज ठाकरे

**मुंबई : प्रतिनिधी**

राजकीय आणि तांत्रिक आकलन सर्वोत्कृष्ट असलेला माणूस देवेंद्र फडणवीस आहे यामध्ये काही दुमत नाही. एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस हे कॉम्बिनेशन मस्त आहे राज्यात पुन्हा युतीचे सरकार येईल आणि देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होतील, असे भाकित मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी एका वृत्तवाहिनीच्या मुलाखतीमध्ये वर्तवले आहे.

‘एकनाथ शिंदेंनी जी गोष्ट केली ती अत्यंत योग्य केली. याचे कारण तुम्ही विचारप्रणाली, बाळासाहेब सर्वांना बाजूला काढले आणि काँग्रेससोबत गेलात. धुसफूस यासह त्यांची वैयक्तिक महत्त्वाकांक्षादेखील असेल. मुख्यमंत्री का केले नाही असेही असेल, पण ज्या प्रकारे ती खेळी झाली आणि काँग्रेस-राष्ट्रवादीसोबत जाऊन बसणे हे कित्येक शिवसेना आमदार, शिवसैनिकांना पटले नसेल. इतकी वर्षं ज्यांच्या विरोधात निवडणुका लढवल्या त्यांच्यासोबत एका व्यक्तीच्या स्वार्थासाठी जाऊन बसत आहोत. अडीच वर्षांचा काळ पाहिला तर हे दोन वर्षं आधीच झाले असते, पण मध्ये कोविड आला, असे राज म्हणाले.

एकनाथ शिंदेंना कधी तुमचे चुकले आहे का? हे सांगितले का असे विचारले असता ते म्हणाले, एकदा गोष्ट घडल्यानंतर त्याबाबत बोलण्याला काही अर्थ नाही. मला पटत नाहीत त्या गोष्टी एकनाथ शिंदेंकडून झाल्या असतील, पण तो माणूस दिलदार मनाचा, लोकांना मदत करणारा आहे. पुण्यात पूर आल्यानंतर मी त्यांना भेटलो आणि दोन मुले शॉक लागून गेल्याचे सांगितले. त्यांनी एक मिनिटाचा विचार न करता कुटुंबासाठी १० लाखांचे चेक साईन करायला लावले आणि पोहचलेदेखील. राजकारणात राजकीय माणूस कंजूस असून चालत नाही. त्याने सढळ हाताने मदत करावी लागते. त्यांच्याकडे ती वृत्ती आहे, अशा शब्दांत राज यांनी त्यांचे कौतुक केले.

देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होतील असे माझे भाकीत आहे. अमित शाहदेखील दोनदा बोलले. पुढील आव्हाने फडणवीस सांभाळतील असे तेच म्हणाले. सध्या एकनाथ शिंदे मुख्यमंत्री आहेत. ते मुख्यमंत्री व्हावे म्हणून तिकडून येथे आले असतील असे मला वाटत नाही. भाजपने त्यांना मुख्यमंत्री केले. त्या वेळीही मुख्यमंत्रिपदाचे दावेदार फडणवीसच होते. त्याआधी मुख्यमंत्री होते. परत सरकार बसतंय तेव्हा ज्याचे सर्वाधिक आमदार त्याचाच मुख्यमंत्री बसतो, असे राज ठाकरेंनी म्हटले.



### २३ तारखेनंतर पुढचे ठरवू!

मी गुढीपाडव्याच्या मेळाव्यात माझा पाठिंबा पंतप्रधान नरेंद्र मोदींना आहे, पण विधानसभेच्या कामाला लागा असे सांगितले. म्हणजे यांच्याशिवाय निवडणूक लढवतोय हे तेव्हा स्पष्ट केले होते. प्रत्येक जिल्हा, तालुक्यात माझी माणसं, लोकं, केडर, मतदार आहेत. मग माझे मला तर कळू देत. युतीचे सरकार सत्तेत येईल असा माहोल आहे. त्यांना आमच्या आमदारांची गरज लागेल. २३ तारखेनंतर जी काही स्थिती असेल ती पाहू आणि पुढे जाऊ, असे राज ठाकरे यांनी स्पष्ट केले.

# दाट धुक्यामुळे चार वाहनांचा विचित्र अपघात

## परशुराम घाटातील घटना; काही प्रवासी जखमी, रुग्णालयात दाखल

**चिपळूण : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर परशुराम घाटात रविवारी (दि. १०) सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास मोटरसायकल, एसटी, ट्रक आणि कार यांचा विचित्र अपघात झाला. या अपघातात काही प्रवासी जखमी झाले तसेच चारही वाहनांची मोठी हानी झाली.

महामार्गावर परशुराम घाटात एकेरी वाहतूक सुरू करण्यात आली आहे. चिपळूणकडून खेडच्या दिशेने येणारी एसटी आणि समोर येणाऱ्या ट्रक यांची धडक झाली. या वेळी मागून येणारी कार एसटी बसवर जोरदार आदळली.



त्यामुळे एसटी चालक जखमी झाल्याची माहिती आहे, तर एक दुचाकीस्वारही यामध्ये जखमी झाला आहे. एसटी बसमधून काही लोक दापोलीकडे पर्यटनासाठी निघाल्याची प्राथमिक माहिती आहे. अपघातातील जखमींना जवळील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.


दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून थंडीचा जोर वाढू लागला आहे तसेच सकाळच्या वेळी धुके दाटते. त्यामुळे वाहने चालवताना चालकांना कसरत करावी लागत आहे. निसर्गरम्य कोकणात तर सकाळी मोठ्या प्रमाणात धुके असते. हवेतला गारवा वाढल्याने तापमानाचा पारा घरसला आहे. त्यामुळे पुढील काही दिवसात थंडी वाढेल व धुक्याचेही प्रमाण अधिक असण्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे वाहनचालकांनी सकाळी तसेच रात्रीच्या वेळी गाड्या सावकाश चालवाव्यात, असे आवाहन करण्यात येत आहे.

## विक्रोळीत कॅश व्हॅनमध्ये आढळल्या चांदीच्या विटा

**मुंबई : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेदरम्यान राज्यभरात पोलिसांनी मोठा बंदोबस्त ठेवला आहे. दरम्यान, विक्रोळीत पोलीस व निवडणूक आयोगाच्या भरारी पथकाने एक कॅश व्हॅन पकडली आहे, ज्यामध्ये साडेसहा टन चांदीच्या विटा आढळल्या आहेत.

चांदीच्या विटा मुलूंडमधील एका गोदामात ब्रिंक्स या कंपनीच्या गाडीतून ठेवण्यासाठी चालल्या होत्या. त्यांची किंमत कोट्यवधींच्या घरात असून या विटा अधिकृत असल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, याबाबत निवडणूक आयोग, इन्कम टॅक्स, पोलीस अधिक तपास करीत आहेत. (सविस्तर वृत्त पान २ वर..)



# कॅश व्हॅनमध्ये सापडल्या चांदीच्या विटा

## निवडणूक आयोग, इन्कम टॅक्सकडून तपास सुरू

**मुंबई : प्रतिनिधी**

आचारसंहितेच्या काळात राज्यभरात ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणात निवडणूक आयोगाच्या भरारी पथकाने धडक कारवाई करीत आतापर्यंत कोट्यवधींचे घबाड जप्त केले. निवडणूक आयोगाने शनिवारी एक कॅश व्हॅन पकडली होती. विक्रोळीत पुन्हा रविवारी (दि.१०) एका कॅन व्हॅनमध्ये साडेसहा टन चांदीच्या विटा सापडल्या आहेत.



या चांदीच्या विटांची किंमत कोट्यवधी रुपये आहे. या चांदीच्या विटा मुलुंडमधील एका गोदाममध्ये ब्रिंक्स या कंपनीच्या गाडीतून ठेवण्यासाठी नेल्या जात होत्या. या विटा अधिकृत असल्याची माहिती समोर आली, मात्र निवडणूक आयोग, इन्कम टॅक्स, पोलीस याचा अधिक तपास करीत आहेत.

राज्यात आचारसंहितेची अंमलबजावणी प्रभावी सुरू असून या काळात नाकेबंदी दरम्यान अनेक शहरात पैशांचे घबाड जप्त करण्यात आली आहेत. राज्य व केंद्र शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या कारवाईत बेकायदा पैसे, दारू, अंमली पदार्थ आणि मौल्यवान धातू इत्यादी बाबतीत एकूण ३९८ कोटी ४० लाख रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आलीय.

राज्यात ७३.११ कोटी रुपयांची रोकड जप्त करण्यात आली. ३७.९८ कोटी रुपयांची दारू ३७.७६ कोटी रुपयांचे ड्रग्ज आणि ९०.५३ कोटी रुपयांच्या मौल्यवान वस्तूही जप्त करण्यात आल्या आहेत. काही दिवसांपूर्वी मुंबई-नाशिक महामार्गावर कसारा घाटातील चिंतामण वाडी पोलीस चौकीजवळ स्थानिक पोलिसांच्या हाती मोठे घबाड लागले होते. पोलिसांनी आज नाकाबंदीदरम्यान नाशिकहून मुंबईकडे जाणारी (एमएच ११ बीव्ही ९७०८) या गाडीत दोन कोटी रुपयांची रक्कम आढळून आली आहे. मुंबई-नाशिक महामार्गावर शहापूर तालुक्यातील कसारा घाटाच्या पायथ्याशी असलेल्या चिंतामण पोलीस चौकीजवळ स्थानिक पोलीस कर्मचाऱ्यांकडून वाहनांची तपासणी करण्यात येत होती. या वेळी (एमएच ११ बीव्ही ९७०८) या गाडीत रोख रक्कम आढळून आली आहे. या गाडीत अंदाजे दोन कोटी रुपयांच्या आसपास रक्कम पोलिसांनी जप्त केली.

# कोकण मार्गावरील एक्सप्रेसला जोडले जाणार एलएचबी डबे

**मुंबई : प्रतिनिधी**

पश्चिम, मध्य, कोकण आणि दक्षिण भारतातील रेल्वे मार्गावरून धावणारी गांधीधाम-नागरकोइल एक्स्प्रेसला नव्या धाटणीचे लिंके हॉफमॅन बुश (एलएचबी) डबे जोडले जाणार आहेत. त्यामुळे डब्यांची वाढविण्यात आलेली लांबी आणि रूंदी, मोठे प्रवेशद्वार, सुधारित रचनेचे बेसीन आणि शौचालय अशा बदललेल्या रुपातील गाड्या आणि त्यातही वाढलेला वेग यामुळे गांधीधाम-नागरकोइल एक्स्प्रेसमधून प्रवास करणाऱ्या कोकणवासियांचा प्रवास अधिक सुखकर आणि आरामदायी होणार आहे.

भारताच्या पश्चिम किनारपट्टीच्या रेल्वे मार्गावरून गांधीधाम-नागरकोइल एक्स्प्रेसचा प्रवास होत आहे. गांधीधाम-नागरकोइल साप्ताहिक एक्सप्रेस ही दक्षिण रेल्वे क्षेत्राशी संबंधित एक्सप्रेस आहे. पश्चिम रेल्वेवरील गांधीधामवरून या एक्स्प्रेसची सेवा सुरू होऊन, दक्षिण रेल्वेच्या नागरकोइल या स्थानकापर्यंत धावते. ही एक्स्प्रेस गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक, केरळ आणि तमिळनाडू या पाच राज्यातून २,३४१ किमी प्रवास करते. या राज्यातील ५५ स्थानकांवर ही एक्स्प्रेस थांबा घेते.

महाराष्ट्रात बोईसर, वसई रोड, भिवंडी रोड, पनवेल, माणगाव, चिपळूण, रत्नागिरी, सावंतवाडी रोड या स्थानकात थांबते. कोकणातील रेल्वे स्थानकात थांबत असल्याने कोकणवासियांसाठी ही एक महत्त्वाची रेल्वेगाडी आहे. त्यामुळे पारंपरिक पद्धतीचे निळ्या रंगातील डब्या ऐवजी लाल-करडा अशा रंगात एक्स्प्रेस असेल. कोकणवासियांना नव्या स्वरूपातील एक्स्प्रेसचा अनुभव घेता येणार आहे. गाडी क्रमांक १६३३६ नागरकोइल-गांधीधाम एक्स्प्रेसला २६ नोव्हेंबर रोजी आणि गाडी क्रमांक १६३३५ गांधीधाम-नागरकोइल एक्स्प्रेसला एलएचबी डबे जोडले जाणार आहेत. या एक्सप्रेसला एक द्वितीय श्रेणी वातानुकूलित डबा, पाच तृतीय श्रेणी वातानुकूलित डबे, ११ शयनयान, २ जनरल डबा, १ एसएलआर डबा, १ पॅन्ट्री कार डबा, १ जनरेटर कार असे एकूण २२ डबे असतील.

# निवडणूक काळात सामान्यांनाही द्यावा लागणार पैशांचा हिशोब

**अलिबाग : प्रतिनिधी**

राजकीय पक्ष, नेते, उमेदवार, कार्यकर्ते यांना माहित असलेल्या आचारसंहितेतील तरतुदी सामान्य नागरिकांस माहित असतीलच असे नाही. या तरतुदी माहित नसणारी सामान्य व्यक्ती पण प्रसंगी अडचणीत येवू शकते, निवडणूक काळात आपल्याकडे असलेल्या किंवा बाळगत असलेल्या रकमेचा हिशोब सामान्य व्यक्तीलाही द्यावा लागणार आहे.

या निवडणूक काळात प्रवासात किंवा स्वतःजवळ ५० हजार रुपये बाळगता येतात. त्यापेक्षा अधिक रक्कम तपासणीत दिसून आल्यास चौकशीस सामोरे जाण्याची आपत्ती आहे. ५० हजार रुपये जर प्रवासात नाक्यावरील स्थिर तपासणी पथक किंवा भरारी पथक यांना तुमच्याजवळ आढळल्यास त्याचा हिशोब तुम्हास द्यावा लागणार आहे. म्हणजे हे पैसे कुठून आणले, कशासाठी काढले, कोणास देणार अशी प्रश्नांची सरबत्ती होणार. त्यासाठी जवळ पुरावा असणे आवश्यक आहे. म्हणजे बँकेतून काढले असल्यास तसा पुरावा लागणार आहे.

चेक देऊन काढले असल्यास चेकची झेरॉक्स किंवा तांत्रिक पुरावा म्हणजे बँकेचा पैसे काढल्याचा एसएमएस संबंधित तपासणी अधिकाऱ्यांस दाखवावा लागेल. तो नसेल तर मग तुमच्याकडील पैसे अधिकारी ठेवून घेईल. त्याची पावती देईल व सदर रकमेचा पुरावा दिल्यानंतर तुमचे पैसे तुम्हास परत मिळतील, पण याबाबत निवडणूक संहिता थोडी उदार पण आहे. पैसे घेऊन जाणारी व्यक्ती कोण व कशी आहे हे प्रथमदर्शनी सहज ओळखता येऊ शकते. म्हणजे शेतकरी शेती खर्चाचे किंवा मालविक्रीचे पैसे घेऊन जात असेल तर त्यास नाहक त्रास देऊ नये, खरे काय ते ओळखावे, असे धोरण आहे.

सामान्य माणूस या तपासणीत गोंधळून जातो. त्याच्याकडे असणाऱ्या रकमेचे योग्य समर्थन करता येईलच असे नाही. अशा वेळी अधिकारी कसे आहेत यावर सगळे काही अवलंबून असते, असे एका अधिकाऱ्याने नमूद केले. जवळ असलेल्या अधिकच्या पैशाचे समर्थन पुराव्याशिवाय करता आले नाही तर ते पैसे ठेवून घेत त्या व्यक्तीस बँकेकडून पैसे काढले असे लिहून असणारा कागद आणावा लागणार आहे. याची पद्धती निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार कार्यवाही होणार, पण असलेल्या रकमेचा पुरावा जवळ ठेवणे केव्हाही चांगले, असे सांगण्यात आले.

# सुवर्णकार समाजाचा महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांना पाठिंबा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, पीआरपी आणि मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार लोकप्रिय व कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांना नवी मुंबई सुवर्णकार विकास मंडळाने पाठिंबा जाहीर केला आहे.

या संदर्भात नवी मुंबई सुवर्णकार विकास मंडळाचे अध्यक्ष संजय खरोटे यांनी पाठिंबा पत्र दिले आहे.

नवी मुंबई सुवर्णकार विकास मंडळाच्यावतीने आमदार प्रशांत ठाकूर यांना देण्यात आलेल्या पाठिंबा पत्रात म्हटले आहे की, खारघर, कळंबोली, नावडे, तळोजा, खांदेश्वर, कामोठे, खांदा कॉलनी, पनवेल, नवीन पनवेल व परिसरातील सर्व सुवर्णकार समाज स्थायिक रहिवाशी सभासद बंधू भगिनींतर्फे महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांना आम्ही जाहीर पाठिंबा देत आहोत.

नवी मुंबई सुवर्णकार विकास मंडळाचे सभासद व त्यांचे कुटुंबीय असे समस्त सुवर्णकार समाज बांधव मतदार आपल्या सदैव पाठीशी असल्याचे नमूद करून भरघोस मतांनी विजयी होण्यासाठी शुभेच्छाही या पत्रातून दिल्या.

# भाजपची आढावा बैठक; सुलक्षणा सावंत यांनी केले मार्गदर्शन

**उरण : वार्ताहर**

भाजपचे उमेदवार महेश बालदी यांच्या प्रचारानिमित्त उरण द्रोणागिरी येथील श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर विद्यालय येथे रविवार (दि.१०) गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्या सौभाग्यवती सुलक्षणा सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली आढावा बैठक झाली.

त्यांनी निवडणुकीसंदर्भात मोलाचे मार्गदर्शन केले. या वेळी भाजप रायगड जिल्हा महिला उपाध्यक्षा संगीता पाटील, उरण तालुका महिला मोर्चाध्यक्ष राणी म्हात्रे, उरण नगर परिषद माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, शहर महिलाध्यक्ष संपूर्णा थळी, प्रमुख महिला पदाधिकारी उपस्थित होते.



# मध्य रेल्वे संरक्षण दलाचे ऑपरेशन नन्हे फरिश्ते

## हरवलेल्या ८६१ मुलांचे त्यांच्या पालकांसोबत पुनर्मिलन

**रोहे : प्रतिनिधी**

रेल्वे संरक्षण दल (आरपीएफ) ऑपरेशन नन्हे फरिश्ते अंतर्गत मुलांची सुटका करण्यासाठी इतर भागधारकांसोबत काम करीत आहे. १ एप्रिल ते ३१ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत मध्य रेल्वेच्या रेल्वे संरक्षण दलाने एकूण ८६१ मुलांना त्यांच्या कुटुंबियांसह पुनर्मिलनास मदत केली आहे.

सुटका करण्यात आलेल्या मुलांचे महिन्यानिहाय तपशील पहाता एप्रिलमध्ये ५६, मेमध्ये ९३, जूनमध्ये ९५, जुलैमध्ये २०२, ऑगस्टमध्ये १४१, सप्टेंबरमध्ये १६०, ऑक्टोबरमध्ये ११४ असे एकूण ८६१ एवढी आहे.

काही भांडण किंवा काही कौटुंबिक समस्यांमुळे किंवा चांगले जीवन किंवा शहराचे ग्लॅमर आदींच्या शोधात आपल्या कुटुंबियांना न सांगता रेल्वे स्थानकावर येणारी मुले प्रशिक्षित आरपीएफ जवानांना आढळतात. हे प्रशिक्षित आरपीएफ कर्मचारी मुलांशी संपर्क साधतात, त्यांच्या समस्या समजून घेतात आणि त्यांना त्यांच्या पालकांशी पुन्हा एकत्र येण्यासाठी सल्ला देतात.

# वाशिवलीत गावठी बनावटीची बंदूक जप्त

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस ठाणे हद्दीतील वाशिवली आदिवासीवाडी रोडलगत एका आरोपीकडून गावठी बनावटीची बंदूक जप्त केली आहे.

सहाय्यक फौजदार राजेश पाटील, संदीप पाटील, हवालदार यशवंत झेमसे, सुधीर मोरे, राकेश म्हात्रे हे रसायनी पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना हवालदार यशवंत झेमसे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून त्यांनी सापळा रचत आरोपी योगेश चंदर ठोंबरे (वय ४१, रा. वाशिवली, खालापूर) याच्याकडून २५००० रु. किमतीचा एक गावठी बनावटीची बंदूक व दोन जिवंत काडतूसे जप्त केले. याबाबत रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झालेला असून वरिष्ठ पोलीस निरिक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली रसायनी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# सामूहिक मतदार प्रतिज्ञा घेत नवी मुंबईकरांनी केला मतदानाचा निर्धार

**नवी मुंबई : बातमीदार**

विधानसभा निवडणुकीमध्ये आम्ही मतदान करणार असा निर्धार करीत तुम्हीही मतदान करा, असे आवाहन नवी मुंबईत ठिकठिकाणी स्वीप कार्यक्रमांतर्गत आयोजित केलेल्या उपक्रमांमध्ये नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने केले.




विधानसभेच्या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी याकरिता ऐरोली आणि बेलापूर या दोन्ही विधानसभा निवडणूक कार्यालयांमार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत शुक्रवारी (दि.८) नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात महापालिका आयुक्तांसमवेत सर्व अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांनी एकत्रितपणे सामूहिक मतदार प्रतिज्ञा ग्रहण केली. त्याचप्रमाणे महानगरपालिकेच्या ८ विभाग कार्यालयांमध्ये तेथील सहाय्यक आयुक्त यांच्यासह सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी उपस्थित नागरिकांसह मतदार प्रतिज्ञा घेतली.

आठही विभाग कार्यालय क्षेत्रात विविध ठिकाणी नागरिकांना एकत्र करून त्यांना मतदानाचे महत्त्व पटवून देण्यात आले आणि त्यांच्यासह मतदार प्रतिज्ञा सामूहिकरित्या घेण्यात आली.

याशिवाय ऐरोली विधानसभा निवडणूक कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकारी सुचिता भिकाने आणि बेलापूर विधानसभा मतदार निवडणूक कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकारी अश्विनी पाटील यांनी निवडणुकीसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या समवेत मतदान प्रतिज्ञा घेतली.

ऐरोली विधानसभेच्या स्वीप नोडल अधिकारी उपायुक्त अभिलाषा म्हात्रे आणि बेलापूर विधानसभा स्वीप नोडल अधिकारी सहा. आयुक्त सागर मोरे यांच्या माध्यमातून शनिवारी (दि.९) महानगरपालिका क्षेत्रात शासकीय कार्यालये, नाट्यगृह, मॉल, रेल्वे स्टेशन, उद्याने, पर्यटनस्थळे अशा नागरिकांची वर्दळ असणाऱ्या विविध ठिकाणी रांगोळी काढून त्यातून मतदान करण्याचा संदेश प्रसारित करण्यात आला.

पान १ वरुन

## आमदार महेश बालदी ४० हजारांहून अधिक मताधिक्याने विजयी होतील

शिवाय या विमानतळाला अदानींचे नाव दिले असल्याचा खोटा प्रचार उबाठा सेना व महाविकास आघाडी करीत असून त्यातून जनतेत गैरसमज पसरवले जात आहेत, परंतु 'दिबां'चे नाव विमानतळाला देण्यासाठी भाजपच नेहमी आग्रही राहिला असून त्यासाठी सर्व प्रशासकीय प्रक्रिया भाजप सरकारने पूर्ण केली आहे. लवकरच हे विमानतळ लोकनेते दि.बा. पाटील यांच्या नावाने ओळखले जाईल, हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट असल्याचे 'दिबां'चे पुत्र अतुल पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले. इतर मान्यवरांचीही समयोचित भाषणे झाली.

या सभेला भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, प्रकल्पग्रस्तांचे झुंझार नेते दिवंगत दि.बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील, शिवसेनेचे तालुकाप्रमुख महेंद्र पाटील, रूपेश पाटील, मनोज घरत, महिला जिल्हाध्यक्ष सुप्रिया साळुंखे, शहर प्रमुख सोनल घरत, राष्ट्रवादी काँग्रेसचे वैजनाथ ठाकूर, भाजप जिल्हा चिटणीस रूपेश धुमाळ, पनवेल तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, उपाध्यक्ष एस.के. नाईक, माजी जि.प. सदस्य विजय भोईर, गव्हाणचे माजी उपसरपंच विजय घरत, वहाळचे माजी उपसरपंच अमर म्हात्रे, मंगेश वाकडीकर, महेश कडू, भार्गव ठाकूर, निलेश खारकर, वितेश म्हात्रे, धीरज ओवळेकर, राकेश गायकवाड, योगिता भगत, मंजुळा कोळी, पंडितशेठ म्हात्रे, निकीता खारकर, सुभाष म्हात्रे, गजानन पाटील, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, माजी सरपंच हरेश्वर म्हात्रे, बळीराम घरत, गोपीशेठ म्हात्रे, प्रतिक मोरे, नार्सी खान, आर्देयोगी शुक्ला, मदन पाटील, अवदेश महतो, कृष्णा सागरेवन, मासानम मोणार, रोहित शर्मा, ॲड. सनिल मोर्या, कैलाश मिश्रा, डॉ. भरून कुमार, कैलास गोंधळी, अंकुश ठाकूर, सी.एल. ठाकूर, मेघाताई दमडे, किशोर पाटील यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या सभेत उलवे नोडसह उरण मतदारसंघातील विविध ठिकाणच्या शेकडो कार्यकर्त्यांनी आमदार महेश बालदी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. सर्व पक्षप्रवेशकर्त्यांचे स्वागत करण्यात आले. या सभेचे औचित्य साधून भाजप युवा मोर्चा पळस्पे पंचायत समितीच्या उपाध्यक्षपदी आदित्य बेडेकर यांची नियुक्ती करण्यात आली.

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विजयात चर्मकार समाज खारीचा वाटा उचलणार -शिवदास कांबळे

सोयीनुसार संविधान बदलण्याचे काम काँग्रेस पक्षाने स्वार्थासाठी केले असल्याचे सांगून आमदार प्रशांत ठाकूर पुढे म्हणाले की, पीएम आवास, उज्वला गॅस, शौचालय, मातृवंदन योजना, जलजीवन मिशन, लाडकी बहीण योजना, मुलींना मोफत उच्च शिक्षण, पीएम किसान, शेतकरी सन्मान, पीक विमा, आरोग्य योजना, अशा अनेक लोकहिताच्या योजना सरकारने राबवल्या आहेत. त्यामुळे लोकांचे काम करणारे हे सरकार पुन्हा येण्यासाठी मला विजयी करा.

राम प्रहर
वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी

# कळंबोलीत मायाक्का देवीचा उत्सव जल्लोषात साजरा

**कळंबोली : बातमीदार**

कळंबोलीत मायाक्का देवीचा उत्सव मोठ्या जल्लोषात आणि भक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. उत्सवानिमित्त कळंबोली वसाहतीमधून देवीच्या प्रतिमेची मिरवणूक वाजत गाजत ढोल-ताशांच्या गजरात, भंडारा उधळीत अन् फटाक्यांच्या आतषबाजित काढण्यात आली. या उत्सवामध्ये कळंबोली वसाहतीमधील धनगर समाज बांधव व मायाक्का देवीचे भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



मंदिरापासून मायाक्का देवीच्या प्रतिमेची मिरवणूक ढोल-ताशांच्या गजरात, भंडारा उधळीत अन् येळकोट येळकोट जय मल्हारचा जयघोष करीत पालखीतून काढण्यात आली. यामध्ये समाज बंधू ,महिला, बच्चे कंपनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या मिरवणुकीत महिला भगिनींनी फुगड्यांचा फेर ही धरला. मायाक्का देवीच्या उत्सवानिमित्त धनगर समाज बांधव मोठ्या संख्येने मायाक्का देवीच्या मंदिरात एकत्रित जमा झाले होते.

यानिमित्ताने विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजनही करण्यात आले होते. मायाक्का देवीच्या पालखी सोहळा वाजत-गाजत गजी नृत्याचा आविष्कार करीत भंडारा उधळीत कळंबोली वसाहतीमधून फिरवण्यात आली.

या वेळी पालखी सप्तशृंगी मंदिराजवळ येतात. धनगर समाज बांधवांनी भंडाऱ्याची उधळण करीत देवीच्या देवळात मिरवणूक घेऊन मानही देण्यात आला.

# महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा सुधाकर घारे यांना पाठिंबा

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत विधानसभा मतदारसंघात अपक्ष म्हणून निवडणूक लढविणारे सुधाकर घारे यांना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने पाठिंबा जाहीर केले. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मनसेचे वतीने सुधाकर घारे यांच्या विनंतीपत्रानंतर पाठिंबा देणारे पत्र जारी केले आणि सुधाकर घारे यांना आशीर्वाद दिले.

अपक्ष उमेदवार सुधाकर घारे यांची आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना अध्यक्ष राज ठाकरे याची भेट मुंबई येथील शिवतीर्थ बंगला येथे झाली. त्या ठिकाणी राज ठाकरे यांनी आपल्या पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांशी चर्चा करून काही मिनिटात तत्काळ सुधाकर घारे यांना पाठिंबा जाहीर केला. त्यानंतर



मनसेचे प्रदेश सरचिटणीस अनिल शिदोरे यांनी कर्जत विधानसभा मतदारसंघात परिवर्तन आघाडीचे उमेदवार सुधाकर घारे यांना पाठिंबा पत्र दिले. या वेळी खोपोलीचे माजी नगराध्यक्ष दत्ताजी मसुरकर, भरत भगत यांच्यासह कर्जत-खालापूर तालुक्यातील कार्यकर्ते उपस्थित होते.

सुधाकर घारे यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचे त्यांना पाठिंबा दिल्याबद्दल आभार मानले.

# सुकापूरमध्ये शेकापला जोरदार धक्का

## ग्रामपंचायत सदस्य चंद्रकांत पोपेटा समर्थकांसह भाजपमध्ये



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शेतकरी कामगार पक्षाच्या स्वार्थी राजकारणाला कंटाळून सुकापूर ग्रामपंचायतीचे सदस्य चंद्रकांत चाहूशेठ पोपेटा यांनी शेकापतून स्वगृही भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश करत शेकापला जोरदार धक्का दिला आहे.

महायुतीचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रचाराचा झंझावात सुरू आहे. चंद्रकांत पोपेटा यांच्यासह गुरुनाथ पाटील, सुरेश गुप्ता, दीपक गायकवाड आणि त्यांच्या समर्थकांनी भाजपमध्ये प्रवेश केला. राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते त्यांचा प्रवेश पनवेलमध्ये झाला. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, उरणचे भाजप आमदार महेश बालदी, संघटन मंत्री सतीश धोंड, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, अरुणशेठ भगत, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, भूपेंद्र पाटील, जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, किशोर सुरते, राजेश पाटील, महेश पाटील, सचिन पाटील, ज्ञानेश्वर पाटील तसेच अनेक मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

शेकापच्या ढोंगी पुढारी स्वतःच्या मतलबी राजकारणासाठी लोकांची माथी भडकविण्याचे काम करत असल्याचे सर्वत्र जाहीर आहे. निवडणूक आल्यावर थापा मारायच्या हा त्यांचा प्राणच आहे, त्यामुळे त्यांच्या भूलथापांना बळी पडू नका, असे आवाहन अमित जाधव यांनी या पक्षप्रवेशाचा निमित्ताने नागरिकांना केले आहे.

# शेकाप, काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते भाजपमध्ये दाखल

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

जात-पात-धर्म-पंत न मानता नेहमीच विकासाचे राजकारण करणारे आणि उरणचा सर्वांगिण विकासासाठी कटीबद्ध असलेले आमदार महेश बालदी यांच्या कार्यप्रणावीवर विश्वास ठेऊन शेकाप आणि काँग्रेसच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये जाहीर पक्ष प्रवेश केला आहे.

या सर्व प्रवेश कर्त्यांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पक्षात स्वागत करून तुम्ही जो विश्वास ठेवून भाजपात आला तो सार्थ ठरल्याशिवाय राहणार नाही, असे सांगितले. उलवे नोडमध्ये आमदार महेश बालदी यांच्या प्रचारासाठी आयोजित केलेल्या सभेत हा पक्ष प्रवेशाचा कार्यक्रम झाला.



या वेळी काँग्रेस पक्षातील वरचे ओवळेचे माजी सरपंच मोहन घरत, किरण मढवी, वहाळमधील सामजिक कार्यकर्ते विकी घरत, उलवेमधील शेकापचे नेते नासीर खान, मंगेश दापोलकर, रूपेश सुरते, समीर सुरते, भागेश सुरते, प्रतीक सुरते, भरत सुरते, प्रतीक सुरते, भरत सुरते, संजय सुरते, लहू सुरते, योगेश सुरते, कल्पेश सुरते, रामदास सुरते, राजेश बेणारे, किरण मढवी, अमर मढवी, जितेंद्र मढवी, उमेश पाटील, प्रवीण मुंबईकर, समीर मढवी, अमित मढवी, रत्नेश मढवी, रतेश मढवी, आकाश मढवी, प्रतीक्षित भोईर, हेमंत पाटील, विश्वनाथ पाटील, सुरज पाटील, ऋषभ पाटील, सौरभ पाटील, रोहन पाटील, मिलींद पाटील, चेतन पाटील, प्रसाद पाटील, सुभाष पाटील, सुरेश पाटील, मेघनाथ पाटील, भानुदास पाटील, प्रदीप दुपारगुंडे, मोहा कोळीवाडामधील शेकापचे महादेव कोळी यांनी भाजपचे विकासाचे कमळ हाती घेतले.

# आळी आंबिवलीतील ठाकरे गटाचे कार्यकर्ते भाजपत



**रसायनी : रामप्रहर वृत्त**

शिवसेनेचा बालेकिल्ला असणाऱ्या मोहोपाडा आळी आंबिवली येथील ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षामध्ये जाहीर प्रवेश केला. आमदार महेश बालदी यांच्या हस्ते प्रवेश करत्यांचे शाल, पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

या वेळी भारतीय जनता पक्षाचे वासांचे विभागीय अध्यक्ष सचिन तांडेल, वासांबे मोहोपाडा ग्रामपंचायतीचे उपसरपंच भूषणशेठ पारंगे, माजी सदस्य स्वप्निल राऊत, जयदत्त भोईर, भाजप मोहपाडा शहर अध्यक्ष चेतन जाधव, माजी सरपंच विजय मिरकूटे, गुळसुंदे विभागडॉ अविनाश गाताडे, केतन जाधव आदी उपस्थित होते.

या वेळी किशोर (बंटी) भोईर, युवासेना (उबाठा) शहर शाखा प्रमुख केतन भोईर, लक्ष्मण मल्ली, तुषार मल्ली, दर्शन भोईर, चेतन शिंदे, प्रथमेश शिंदे, प्रथम शिंदे, साहील शिंदे, निखिल कावडे, संकेत पवार, समीर पवार, सुजित पवार, राहुल टॅबे, अनिकेत चव्हाण, ओंकार शिंदे, सचिन अस्वले, सागर अस्वले, सौरम अस्वले, विशाल अस्वले, किरण अस्वले, चैतु पांगत, राजेश भोईर, दिनेश भोईर, नितु जाधव, दिपक जाधव यांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला.

# कळंबोलीत विविध समाज घटकांसोबत प्रचार बैठका

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रचारासाठी गोव्याचे आमदार व गोवा सरचिटणीस दयानंद सोपटे व संघाचे प्रचारक माधव गांगुर्डे यांनी बैठका लावण्यासाठी भाजप भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे यांच्यावर जबाबदारी सोपवलेली होती. त्या अनुषंगाने कळंबोली संपर्क कार्यालयामध्ये उत्तर भारतीय समाज तसेच दक्षिण भारतीय समाज केरला, समाज, तेलगू कन्नडा समाज, मुथुपन्न सेवा समिती समाज इत्यादी समाज घटकांबरोबर बैठका झाल्या.

सर्वांशी प्रत्यक्ष चर्चा करून जास्तीत जास्त मतदान कसे वाढवता येईल यावर चर्चा करण्यात आली. सर्व समाजातील मान्यवरांनी आमदार प्रशांत ठाकूर यांना भरघोस मतांनी विजयी करण्याचे आश्वासन दिले. या बैठकीसाठी उत्तर भारतीय समाजाचे मनोरंजन सिंग नीरज मिश्रा अशोक मिश्रा, बिपिन सिंग, राम शरण यादव, सुशील यादव, अभिषेक सिंग तसेच दक्षिण भारतीय सेलचे प्रदेश उपाध्यक्ष रमेश नायर माजी नगरसेवक संतोष शेट्टी, अमर पाटील व विविध पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.






**पनवेल : व्यापारी महासंघ पनवेल आणि नवीन पनवेलच्या वतीने दीपावली स्नेहसंमेलनाचे आयोजन शनिवारी करण्यात आले होते. या स्नेहसंमेलनामध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांनी सहभागी होत व्यापारी बांधवांसोबत संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या तसेच व्यापारी बांधवांनी आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर दाखवलेला विश्वासावर खरे उतरून व्यापारीवर्गाच्या प्रगतीसाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न करण्याचा निर्धार केला. या वेळी मोतीलाल जैन, दिनेशभाई मिराणी, राजेश बांठिया, शैलेंद्र खिरोडिया, नारायण ठाकूर, भाजपचे जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, माजी नगरसेक राजू सोनी, संजय जैन यांच्यासह व्यापारी बांधव उपस्थित होते.**

# दिघोडे येथे आमदार महेश बालदी यांच्या प्रचार रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद

**उरण : वार्ताहर**

दिघोडे येथील प्रचार रॅलीला मतदारांचा प्रचंड प्रतिसाद लाभला होता. या वेळी कार्यकर्त्यांनी आमदार महेश बालदी यांनी केलेल्या विकास कामाचा कार्य अहवाल पुस्तिका घरा-घरात मतदारांन पर्यंत पोहचविण्याचे काम केले.



उरणचे कर्तव्य दक्ष आमदार महेश बालदी हे पुन्हा १९० उरण मतदार संघातून निवडणूक लढवत आहेत. त्यांनी या मतदार संघात ५०० कोटींची विकास कामे करेन, असे आश्वासन दिले होते. प्रत्यक्षात त्यांनी या मतदार संघात साडे पाच हजार कोटी हुन अधिक रकमेची विकास कामे केली आहेत. या विकास कामांच्या जोरावर ते पुन्हा आमदार होतील, असा ठाम विश्वास मतदारांना आहे.

प्रचार रॅलीवेळी गोवा प्रदेश अद्यक्ष समीर मांजरेकर, उरण तालुका भाजप खजिनदार संदीप पाटील, शैलेश गावंड (विंधणे ग्रामपंचायत सदस्य), युवा मोर्चा सरचिटणीस रमेश पाटील, किसान मोर्चा अध्यक्ष पांडुरंग पाटील, माजी सरपंच सौ. सोनिया मयूर घरत, भाजप गाव अध्यक्ष राजेश पाटील, बूथ अध्यक्ष निलेश पाटील, रूपेश कोळी, हरजीवन ठाकूर, समीर ठाकूर, शरद कोळी, राजेंद्र म्हात्रे, नरेश कोळी, बाळकृष्ण पाटील, बामा पाटील, संदीप पाटील, रघुनाथ घरत, जगदीश कोळी, प्रकाश कोळी, गुरुनाथ पाटील, मयूर माळी, अश्विन पाटील, ऋषिकेश ठाकूर, आशीर्वाद कोळी, मिलिंद कोळीसह महिला पदाधिकारी मेघा राजेश पाटील, श्रद्धा म्हात्रे, लक्ष्मी ठाकूर, सुमन कोळी, प्रणाली पाटील, राखी पाटील आदी सह भाजप पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# मोरा कोळीवाडा येथे कार्य अहवाल पुस्तिकेचे वाटप

**उरण : वार्ताहर**

उरण विधान मतदारसंघाचे उमेदवार महेश बालदी यांचा सर्वत्र प्रचार सुरू झाला आहे. उरण-मोरा कोळीवाड्यातील भाजप कार्यकर्त्यांनी महेश बालदी पाच वर्षे आमदार असताना केलेल्या विकासाची कामे, कार्य अहवाल पुस्तिकाचे वाटपाचे काम कार्यकर्ते करीत आहेत.



मोरा कोळीवाड्याती प्रत्येक घरा-घरात जावून कार्यकर्त्यांनी पुस्तिकाचे वाटप केले. या वेळी उरण नगर परिषद माजी उपनगराध्यक्ष जयविन कोळी, माजी नगरसेविका रजनी कोळी, माजी नगरसेविका नंदा माझगावकर, माजी नगरसेवक राजेश कोळी, मदन कोळी, अप्पू कोळी, रोहित कोळी, रोहिनी कोळी, गीता कोळी, दीपा कोळी, कीर्ती कोळी आदी उपस्थित होते.

# समस्त गुजराती लोहाणा समाजाचे युवा प्रमुख निल पुजारा भाजपमध्ये

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकप्रिय व कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेऊन समस्त गुजराती लोहाणा समाजाचे युवा प्रमुख निल पुजारा यांनी त्यांच्या समर्थकांसह भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते त्यांचा पक्षात स्वागत करण्यात आले.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, गोवा राज्याचे आमदार दयानंद सोपटे, भाजपचे संघटन मंत्री सतीश धोंड, प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, जिल्हा सरचिटणीस व पनवेल विधानसभा प्रमुख नितीन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, चारुशीला घरत, शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी महापौर कविता चौतमोल, माजी नगरसेवक हरेश केणी, बबन मुकादम, तालुका उपाध्यक्ष एस. के. नाईक, तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, ज्येष्ठ नेते सी.सी.भगत, कामोठे अध्यक्ष रवींद्र जोशी, खारघर अध्यक्ष प्रवीण पाटील, कळंबोली अध्यक्ष रविनाथ पाटील, अमरीश मोकल, युवा नेते प्रतीक सादरानी यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

निल पुजारा यांच्याकडे युवकांची फळी आहे, त्यामुळे त्यांच्या प्रवेशाने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मताधिक्यात भर पडणार आहे.



# वडाळे तलाव येथे मतदान जनजागृती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीत मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी जनजागृती करण्यासाठी आयुक्त मंगेश चितळे निर्देशानुसार व स्वीप प्रमुख मा. शहर अभियंता संजय कटेकर यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतेच वडाळे तलाव येथे मतदान जनजागृती कार्यक्रम आयोजन करण्यात आले.



या वेळी अतिरिक्त आयुक्त भारत राठोड, उपायुक्त कैलास गावडे, प्रसेनजित कार्लेकर, स्वीप पथक प्रमुख शहर अभियंता संजय कटेकर, सहाय्यक आयुक्त रूपाली माने, सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर, समाज विकास तज्ज्ञ स्वप्नाली चौधरी, अभियंता गजानन देशमुख, अभियंता प्रसाद परब उपस्थित होते.

येत्या २० नोव्हेंबर रोजी पनवेल विधानसभेची निवडणुक होणार असून या पार्श्वभूमीवर स्वीप कार्यक्रमांची (सिस्टेमॅटिक वोटर्स एज्युकेशन इलेक्ट्रोल पार्टिसिपेशन प्रोग्रॅम) अमंलबजावणी १८८ पनवेल अंतर्गत महापालिका कार्यक्षेत्रात केली जात आहे. स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदान जनजागृती कार्यक्रम राबविण्यासाठी नुकताच वडाळे तलाव येथे मतदान जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या वेळी उपस्थित महापालिका अधिकांऱ्यानी समाजातील सर्व घटकांमधील नागरिकांना मतदान करण्याचे आवाहन केले.

या वेळी वासुदेवांनी पारंपारिक वेशात मतदानाविषयी जन-जागृती करण्यासाठी प्रबोधन केले तसेच फ्लैशमॉबद्वारे व मास्कॉटसच्या माध्यमातूननागरिकांना मतदानाचे महत्त्व पटवून देण्यात आले. मतदान जनजागृतीचा मोठा बलून लावण्यात आला होता. याबरोबरच सेल्फी पॉईंट तयार करण्यात आला होता.

या वेळी तृतीय पंथीय, कुष्ठरोग रूग्ण, बचत गटाच्या महिला, महाविद्यालयीन विद्यार्थी, गृहिणी, ज्येष्ठ नागरिक, नागरिक, शालेय विद्यार्थी, महापालिका अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, उपस्थित सर्वांना मतदान शपथ देण्यात आली तसेच स्वाक्षरी मोहिमेद्वारे जनजागृती करण्यात आली.

**खारघर : अग्रवाल समाज नवी मुंबईच्या वतीने शनिवारी खारघरमध्ये दीपावली स्नेहमिलन आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाला पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजप जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, कायदा सेलचे जिल्हा संयोजक राजेंद्र अग्रवाल, मंडल चिटणीस मुकेश अग्रवाल, अग्रवाल समाज खारघरचे प्रवीण गोयल, नंदकिशोर अग्रवाल, अमित अग्रवाल आदी उपस्थित होते.**



## संपादकीय

# प्रचारतोफा धडाडू लागल्या

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीचा प्रचार आता जोर धरू लागला आहे. २० नोव्हेंबरच्या मतदानापूर्वी ४८ तास आधी म्हणजेच १८ तारखेला जाहीर प्रचार करता येणार आहे. त्यामुळे आता नेमकेच दिवस हाती असल्याने दिग्गज नेत्यांच्या प्रचार तोफा राज्यात धडाडू लागल्याचे दिसून येते.

**लोकसभा निवडणुकीनंतर राज्यात आता विधानसभा रणसंग्रामाची लढाई आहे. लोकसभेच्या वेळी वातावरण वेगळे होते. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडी जेवढी अभेद्य होती, तितकी आता दिसत नाही. त्या तुलनेत महायुती अधिक जोमाने कामाला लागल्याचे पहावयास मिळते. उमेदवारी याद्या जाहीर करण्यापासून ते प्रचार आणि जाहीरनामा प्रसिद्ध करण्यातदेखील महायुतीमधील पक्षांनी आघाडी घेतली आहे. त्यानंतर आता दिग्गज नेत्यांच्या प्रचारसभा राज्यभर होत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी धुळे येथील सभेद्वारे प्रचाराचा आरंभ केला. या सभेला केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा रिपाइंचे अध्यक्ष रामदास आठवले, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आदींची उपस्थिती होती. चार दिवसांत पंतप्रधान मोदींच्या नऊ प्रचारसभांचे नियोजन करण्यात आले. त्यानुसार शुक्रवारी नाशिक व धुळे येथे सभा झाल्या. शनिवारी पंतप्रधानांनी अकोला व नांदेड येथे जनसमुदायाला संबोधित केले. पुढे १२ नोव्हेंबर रोजी चिमूर व सोलापूर येथे सभा होणार असून पुण्यात रोड शोचे आयोजन करण्यात आले आहे, तर १४ नोव्हेंबरला छत्रपती संभाजीनगर, खारघर आणि मुंबई या ठिकाणी पंतप्रधान मोदींच्या सभा होणार आहेत. याशिवाय भाजपचे आणखी एक बडे नेते केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही सभांद्वारे विचार मांडत विरोधकांवर हल्लाबोल सुरू केला आहे. त्यांनी शुक्रवारी शिराळा (सांगली), कराड, सांगली आणि सोलापूर अशा एका दिवसात चार सभा घेऊन प्रचाराची राळ उडवून दिली. त्यांच्या आणखीही काही सभा होत असून इतर केंद्रीय मंत्री, वेगवेगळ्या राज्यांचे मुख्यमंत्रीदेखील महाराष्ट्रात येऊन जाहीर सभांतून विचार मांडणार आहेत. केंद्रातील एनडीए सरकारमधील भाजपसोबतच्या घटक पक्षांचे नेतेही राज्यात महायुतीसाठी मतपेरणी करतील. याचबरोबर शिवसेनेचे प्रमुख मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पायाला भिंगरी लावून फिरत असून सभांद्वारे कार्यकर्त्यांमध्ये ऊर्जा निर्माण करीत आहेत. राष्ट्रवादीच्या उमेदवारांसाठी उपमुख्यमंत्री अजित पवार मैदानात उतरले आहेत. महाविकास आघाडीकडून काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांनी महाराष्ट्राचा दौरा सुरू केला आहे. त्यांच्यासोबत पक्षाध्यक्ष मल्लिकार्जून खरगे व इतर नेते असतात. महाविकास आघाडीची भिस्त प्रामुख्याने राज्यातील नेत्यांवरच आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून माजी मुख्यमंत्री व पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे सभा घेत असून त्यांचे चिरंजीव युवासेना अध्यक्ष आदित्य ठाकरे, खासदार संजय राऊत यांच्याही सभा होत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार निवडणूक रणसंग्रामात उतरून सभा घेत आहेत. आम आदमी पक्षाचे प्रमुख व दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल 'मविआ'च्या प्रचारासाठी येणार आहेत. महाराष्ट्र नवनिर्माण सेना या वेळी स्वबळावर निवडणूक लढवत असून राज ठाकरे यांच्या ठिकठिकाणी सभा होत आहेत. या व्यतिरिक्त इतर आघाड्या, पक्षांचे नेतेही आपापल्या परीने मतदारांना आकर्षित करीत आहेत. त्यामुळे येत्या काळात निवडणूकज्वर वाढणार हे निश्चित!**

# रायगड जिल्ह्यात रंगतदार लढती

**खबरबात**
समाधान पाटील

राज्यात विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराला वेग आला आहे. रायगड जिल्ह्यातही प्रचाराचा धुरळा उडत असून महायुती, महाविकास आघाडी आणि इतर पक्ष असा सामना रंगतोय. त्यामुळे जिल्ह्यातील राजकीय वातावरण ऐन थंडीत तापू लागले आहे...

रायगड जिल्ह्याचे राजकारण सातत्याने बदलत असते. लोकसभा निवडणुकीपर्यंत काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षासोबत शेतकरी कामगार पक्षही महाविकास आघाडीमध्ये सहभागी होता. विधानसभा निवडणुकीत मात्र या आघाडीत फूट पडली असून शेकाप आघाडीबाहेर गेला आहे. पनवेल, पेण व अलिबागची जागा शेकापला सोडण्यास शिवसेना उबाठा प्रमुख व माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे राजी होते, पण शेकापवाले उरणसाठीही आग्रही राहिल्याने या आघाडीत बिघाडी झाली. त्यामुळे आता अलिबाग वगळता पनवेल, उरण, पेणमध्ये शेकाप आणि 'मविआ'चे उमेदवार एकमेकांविरोधात लढत आहेत.

जिल्ह्यातील सातपैकी औद्योगिक अशी ओळख असलेल्या उरण विधानसभा मतदारसंघात भाजपचे महेश बालदी विद्यमान आमदार आहेत. त्यांनी मागच्या वेळी शिवसेनेचे तत्कालीन आमदार मनोहर भोईर आणि शेकापचे माजी आमदार विवेक पाटील या दोन बड्या नेत्यांना धूळ चारण्याचा करिष्मा केला होता. या वेळी आमदार बालदी यांच्याविरोधात उबाठाचे माजी आमदार मनोहर भोईर पुन्हा एकदा निवडणूक लढवण्याची तयारी करीत असताना शेकापकडून पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनीही उमेदवारी अर्ज दाखल करून उरणमध्ये दावेदारी सांगितली. त्यामुळे उबाठाकडून शेजारील पनवेल मतदारसंघात माजी नगरसेविका लीना गरड यांना शेकाप उमेदवार विधान परिषदेचे माजी आमदार बाळाराम पाटील यांच्याविरोधात निवडणूक रिंगणात उतरवण्यात आले, जिथे या दोघांना विधानसभा निवडणुकीत सलग तीनदा बाजी मारणारे मातब्बर नेते आमदार प्रशांत ठाकूर यांचे आव्हान आहे.

राज्यात मतदारांच्या दृष्टीने सर्वात मोठा असलेला पनवेल विधानसभा मतदारसंघ विविध प्रकल्पांमुळे जगाच्या नकाशावर आला आहे. उत्तुंग विकासकामे, संघटन कौशल्य आणि व्यापक जनसंपर्काच्या जोरावर यंदा आमदार प्रशांत ठाकूर येथून विजयाचा चौकार लगावण्यासाठी सज्ज झाले आहेत. दुसरीकडे शेकापचा घसरता आलेख व त्यामुळे निवडणूक आयोगाने गोठवलेले खटारा चिन्ह लक्षात घेता बाळाराम पाटील या वेळेस उबाठाच्या मशाल चिन्हावर निवडणूक लढवण्यास इच्छुक होते. त्यांनी तसा प्रचारही सुरू केला होता. एवढेच नव्हे तर त्यांच्याकडून एबी फॉर्मची जुळवाजुळवही चालू होती, मात्र उरणमध्ये प्रितम म्हात्रे यांनी माघार न घेतल्याने बाळाराम पाटील यांना आयत्या वेळी उद्धव ठाकरेंकडून एबी फॉर्म नाकारण्यात आला. त्यामुळे आता उरण आणि पनवेल या दोन्ही मतदारसंघात तिरंगी लढत होत असून अन्य पक्ष तसेच काही अपक्षही आपले राजकीय नशीब आजमावत आहेत.

जिल्ह्यातील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या पेण मतदारसंघातही उरण, पनवेलचे पडसाद उमटून उबाठा आणि शेकाप उमेदवार परस्पर निवडणूक लढवत आहेत. या ठिकाणी भाजपकडून विद्यमान आमदार व माजी मंत्री रविशेठ पाटील यांच्या रूपात तगडा उमेदवार मैदानात असून भाजपमध्ये प्रवेश केलेले शेकापचे माजी आमदार धैर्यशील पाटील त्यांच्यासोबत आहेत. धैर्यशील पाटील यांना भाजपने राज्यसभेची खासदारकी दिली असून पक्षाचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष म्हणूनही ते काम पाहत आहेत. अशा स्थितीत शेकापचे अतुल म्हात्रे आणि उबाठाचे प्रसाद भोईर यांच्यातील मतविभागणी आमदार पाटील यांच्यासाठी पोषक ठरेल.

महाविकास आघाडीत तीन ठिकाणी बिघाडी झाली असताना अलिबाग मतदारसंघ मात्र याला अपवाद ठरला आहे. प्रशासकीयदृष्ट्या जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या अलिबागमध्ये शेकापच्या चित्रलेखा पाटील थेट विधानसभेची निवडणूक लढवत असून त्यांच्याविरोधात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे विद्यमान आमदार महेंद्र दळवी प्रमुख उमेदवार आहेत, तर शेकापमधून भाजपत दाखल झालेले माजी जि.प. सभापती दिलीप भोईर उर्फ छोटमशेठ यांनी अर्ज भरत बंडखोरी केली. त्यामुळे त्यांचे पक्षातून निलंबन करण्यात आले आहे. चित्रलेखा या शेकाप सरचिटणीस, विधान परिषदेचे माजी आमदार जयंत पाटील यांच्या स्नुषा आहेत. आपल्या सुनबाईसाठी महाविकास आघाडीची मोट बांधण्यात सासरेबुवा यशस्वी ठरले असले तरी पाटील घराण्यातच कलह आहे. जयंत पाटील यांचे बंधू माजी आमदार पंडित पाटील आणि भाचा माजी जि.प. उपाध्यक्ष आस्वाद पाटील हे चित्रलेखा यांच्या उमेदवारीमुळे नाराज आहेत. या दोघांनाही मानणारा वर्ग आहे. त्याचा फटका शेकाप उमेदवाराला बसू शकतो. दुसरीकडे आमदार दळवी यांनाही भरपूर मेहनत घ्यावी लागणार आहे.

शेती व शेतीपूरक व्यवसाय तसेच काही प्रमाणात कारखान्यांतून उदरनिर्वाह उपलब्ध होणाऱ्या कर्जत मतदारसंघाला रिसॉर्ट्समुळे नवी ओळख व रोजगार मिळाला आहे. या ठिकाणी तीन उमेदवारांमध्ये प्रमुख सामना आहे, परंतु येथे संदर्भ थोडे वेगळे आहेत. कर्जतमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे महेंद्र थोरवे आमदार आहेत. त्यांच्याविरोधात उबाठाचे नितीन सावंत आणि अपक्ष सुधाकर घारे रिंगणात आहेत. जि.प.चे माजी उपाध्यक्ष राहिलेले घारे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत होते, मात्र महायुतीमधून तिकिट मिळणार नसल्याने त्यांनी राष्ट्रवादीचा राजीनामा देत महाविकास आघाडीतून उमेदवारी मिळवण्याचा प्रयत्न केला, पण तिथेही संधी न मिळाल्याने अखेर ते अपक्ष म्हणून निवडणूक लढत आहेत.

श्रीवर्धन मतदारसंघातून राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे प्रतिनिधित्व करतात. विविध पर्यटनस्थळांचा समावेश असलेल्या या मतदारसंघावर राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे कुटुंबियांचे वर्चस्व आहे. यंदा मंत्री तटकरे यांच्याविरोधात शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून अनिल नवगणे निवडणूक लढवित आहेत. वास्तविक, नवगणे हे उबाठामध्ये होते, मात्र महाविकास आघाडीत ही जागा पवार गटाला सुटल्याने त्यांनी तेथील वाट धरली. या ठिकाणी आता नवा ट्विस्ट आला आहे. काँग्रेसने त्यांच्या पक्षाचे बंडखोर उमेदवार राजेंद्र उर्फ राजाभाऊ ठाकूर यांचा प्रचार करणार असल्याचे जाहीर केले आहे. राजाभाऊ हे अलिबागचे माजी आमदार स्व. मधुकर ठाकूर यांचे पुत्र आहेत. त्यामुळे नवगणेंच्या अडचणी वाढल्या आहेत.

जिल्ह्याचे दुसरे टोक असलेल्या महाड मतदारसंघात महायुती आणि महाविकास आघाडी अशी थेट लढत आहे. या ठिकाणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आमदार भरत गोगावले विरुद्ध उबाठाच्या नेत्या, महाडच्या माजी नगराध्यक्ष स्नेहल जगताप अशा दोन शिवसेना उमेदवारांमध्ये प्रमुख सामना आहे. आमदार गोगावले येथून सलग तीन वेळा निवडून आले असून यंदा चौथ्यांदा रिंगणात आहेत, तर माजी आमदार माणिकराव जगताप यांच्या कन्या असलेल्या स्नेहल या पहिल्यांदाच विधानसभा निवडणुकीला सामोऱ्या जात आहेत.

एकंदर पाहता रायगड जिल्ह्यात अनेक मतदारसंघांमध्ये तिरंगी, तर काही ठिकाणी एकास एक लढती होत आहेत. जिल्ह्यात एकेकाळी काँग्रेस आणि शेकाप हे प्रमुख पक्ष होते. याच दोन पक्षांमध्ये नेहमी चढाओढ व चुरस असायची. आता मात्र हे पक्ष हेलखावे खात आहेत. ज्या रायगड काँग्रेसने राज्याला बॅ.ए.आर. अंतुले यांच्या रूपाने डॅशिंग मुख्यमंत्री, सी.डी. देशमुख यांच्यासारखा अभ्यासू केंद्रीय अर्थमंत्री दिला त्याच पक्षाला यंदा जिल्ह्यात लोकसभेपाठोपाठ विधानसभेची एकही जागा लढवायला मिळाली नाही हे त्यांचे दुर्दैवच म्हणावे लागेल. या पार्श्वभूमीवर काही दिवसांपूर्वी पक्षाचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी याबाबत खंत व्यक्त करून आपल्या पदाचा राजीनामा देत एकच खळबळ उडवून दिली होती. दुसरीकडे शेकापचीही अवस्था बिकट झाली आहे. पूर्वी राज्याच्या राजकारणात शेकापला आवर्जून विचारात घेतले जायचे एवढा त्यांचा दरारा आणि मानमरातब होता. शेकाप नेत्यांशी विचारविनिमय करून जागावाटप केले जात असे. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शेकाप सोडल्यानंतर उरलेल्या नेतेमंडळींनी पक्षाच्या ध्येय-धोरणांना तिलांजली दिली. परिणामी शेकापची पीछेहाट होत गेली. लढवय्या अशी ओळख राहिलेल्या शेकापला अलिकडच्या काही वर्षांमध्ये नेत्यांनी सोयीनुसार वेगवेगळ्या पक्षांच्या दावणीला बांधले. त्यामुळेच ही वेळ त्यांच्यावर आल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जाते. या वेळी महाविकास आघाडीत शेकापला अलिबागखेरिज एकही जागा मिळालेली नाही. शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी अलिबागमध्ये 'मविआ'त बंडाळी होऊ नये याची तजवीज केली; तशीच पक्षाचा प्रमुख या नात्याने इतर ठिकाणी का नाही केली, असा सवालही यानिमित्ताने उपस्थित होतो. तरीदेखील तिथे त्यांच्यासाठी लढत सोपी नाही.

प्रचाराला आता रंगत येऊ लागली आहे. उत्तरोत्तर प्रचार शिगेला पोहचेल. सर्वच पक्ष आपल्या उमेदवारासाठी जोर लावणार आहेत, पण अटीतटीच्या लढतीमध्ये बंडखोरी प्रतिस्पर्धी उमेदवाराच्या पथ्यावर पडू शकते. घोडा मैदान जवळ येतंय, पाहूया पुढे काय काय होतंय...

## बदलते तंत्रज्ञान

# 'या' ॲपवरसुद्धा होणार व्हॉट्सॲपवरून स्टेटस शेअर

सोशल मीडियावर असे अनेक प्लॅटफॉर्म आहेत, ज्यांच्या मदतीने आपण अनेक गोष्टी शेअर करीत असतो, पण अनेकदा असं होतं की, आपल्याला सगळ्यात प्लॅटफॉर्मवर एकत्र फोटो टाकणं शक्य होत नाही आणि आपल्याला विविध ॲपवर जाऊन वेगवेगळे स्टेटस टाकावे लागतात. आता व्हॉट्सॲप एक भन्नाट फीचर घेऊन येत आहे, ज्यात तुम्ही व्हॉट्सॲपवरून दुसऱ्या ॲपवरसुद्धा स्टेटस शेअर करू शकणार आहात.





व्हॉट्सॲपवर तुम्ही पोस्ट केलेले व्हिडीओ, फोटो तुम्ही आता इन्स्टाग्राम ॲपवरसुद्धा शेअर करू शकणार आहात. व्हॉट्सॲप एका नवीन फीचरवर काम करीत आहे; ज्यामुळे युजर्स व्हॉट्सॲप स्टेटस अपडेट इन्स्टाग्रामवरसुद्धा शेअर करू शकतील. तुम्ही आता जसे इन्स्टाग्राम स्टोरीज फेसबुक स्टोरीजवर शेअर करू शकता अगदी त्याचप्रमाणे हे असेल. विशेष म्हणजे या फीचरवर सध्या काम चालू आहे.

सगळ्यात पहिले सेटिंगमध्ये जा, यानंतर प्रायव्हसी हा पर्याय निवडा, त्यानंतर स्टेटस या पर्यायावर क्लिक करा, तुम्हाला स्टेटस प्रायव्हसी दिसेल, त्याच्या खाली तुम्ही पोस्ट केलेले स्टेटस तुम्हाला कोणाला दाखवायचा आहे यासाठी तीन पर्याय तिथे दिसतील, तर त्याच्याच खाली 'शेअर माय स्टेटस अपडेट्स क्रॉस माय अकाउंट्स' असा एक पर्याय दिसेल. तिथे फक्त फेसबुक हा पर्याय सध्या तरी उपलब्ध आहे, पण काही दिवसांनी व्हॉट्सॲप उपडेट झाल्यानंतर फेसबुकच्या खाली तुम्हाला इन्स्टाग्राम हा पर्यायसुद्धा दिसेल; जेणेकरून तुम्ही व्हॉट्सॲपवर पोस्ट केलेले स्टेटस फेसबुकबरोबर इन्स्टाग्रामवरसुद्धा अगदी सहज शेअर करू शकता.

व्हॉट्सॲपचे हे फीचर अपडेट झाल्यानंतर फेसबुक किंवा इन्स्टाग्राम स्टोरीजवर कोणते स्टेटस अपडेट करायचे हे ठरवण्याचे नियंत्रण वापरकर्त्याकडे असेल. कोणत्याही वेळी वापरकर्त्यांना सेटिंग ऑन किंवा ऑफ करण्याचा पर्यायदेखील उपलब्ध असेल. व्हॉट्सॲप अँड्रॉइड ॲपच्या बीटा व्हर्जनवर तुम्हाला हे फीचर दिसेल. मेटा सीईओ मार्क झुकरबर्ग यांनी हा पर्याय केव्हा आणि कधीपासून युजर्सना उपलब्ध होईल याची माहिती दिलेली नाही, पण लवकरच हे फीचर वापरकर्त्यांसाठी आणले जाईल, असे त्यांनी सांगितले आहे.

# समाजसुधारक राजारामशास्त्री भागवत

**निमित्त**



राजारामशास्त्री भागवत हे प्रख्यात विद्वान आणि समाजसुधारक होते. भाषाशास्त्र, समाजशास्त्र, धर्मशास्त्र व्युत्पत्ती, इतिहाससंशोधन, धर्मसुधारणा, वेद-पुराणे, स्मृती वगैरेंची चिकित्सा इ. ज्ञानाच्या क्षेत्रांमधील मोठे प्रज्ञावंत होते. यांचा जन्म ११ नोव्हेंबर १८५१ रोजी कशेळी (ता. राजापूर जि. रत्नागिरी) येथील भिक्षुकी करणाऱ्या कर्हाडे ब्राह्मण कुटुंबात झाला.

१८३० च्या सुमारास इंग्रजी शिक्षणार्थ त्यांचे वडील रामकृष्ण हरी व चुलते भास्कर हरी हे दोघे मुंबईस आले. पुढे रामकृष्ण हरी यांनी मुंबई नगरपालिकेत नोकरी केली. राजारामशास्त्री यांची आई ते लहान असतानाच वारली. वडील वेदान्त विषयाचे भोक्ते होते. सर्वसामान्यांना वेदान्त समजावा म्हणून रामकृष्णपंतांनी सायुज्यसदन (१८६८) आणि कायाजीचा संवाद अशी नाटके लिहिली होती. राजारामशास्त्री १८६७ साली मॅट्रिक झाले.

वडिलांच्या इच्छेनुसार त्यांचे ग्रँट मेडिकल कॉलेजात तीन वर्षे शिक्षण झाले. नंतर वडिलांच्या मृत्यूमुळे हे शिक्षण थांबले. एका संस्कृत पंडिताकडे अध्ययन करुन ते शास्त्री झाले. नंतर रॉबर्ट मनी हायस्कूलमध्ये १८७५ साली ते शिक्षक झाले. नंतर ते सेंट झेव्हिअर कॉलेजात संस्कृतचे प्राध्यापक म्हणून शेवटपर्यंत होते. १९०२ साली मुंबई विद्यापीठात 'विल्सन फायलॉलॉजिकल'लेक्चरर म्हणून त्यांची निवड झाली. शिक्षणविषयक स्वतंत्र ध्येये असल्यामुळे त्यांनी १८८४ साली बॉंबे हायस्कूल व पुढे स्वालंबनाने मराठा हायस्कूल काढले. महर्षी कर्वे, रँ. परांजपे, बॅ, जयकर वगैरे अनेक नामवंत त्यांचे विद्यार्थी होते. भागवत लोकशिक्षक होते. पाश्चात्त्य व पौर्वात्य विविध भाषांचा सखोल अभ्यास शक्य व्हावा म्हणून लॅटिन, ग्रीक, अरबी, फार्सी वगैरे भाषा ते शिकले.

मुंबईमधील सर्वदेशीय वातावरणाचाही त्यांच्यावर परिणाम झाला. विधवाविवाह वगैरे प्रश्नांवर सुरुवातीस त्यांची मते जुनी होती. नंतर मात्र ती पालटली. अस्पृश्यता निवारणाकडेही त्यांनी सक्रिय लक्ष दिले. हिंदू धर्माची शास्त्रबोवांनी जी निस्पृह व निर्भीड समीक्षा केली होती तिच्यासंबंधी डॉ. आंबेडकरांनीही त्यांची प्रशंसा केलेली आहे. १९०० नंतर प्रथम बडोदे व पुढे कोल्हापूर येथे वेदोक्त प्रकरण गाजले. मराठे क्षत्रिय आहेत असे शास्त्राधारयुक्त मत व्यक्त करून राजारामशास्त्री यांनी शाहू महाराजांचा पक्ष घेतला. मराठा मुलांची उपनयने चालू व्हावीत म्हणून कोल्हापूर-बेळगाव येथे जाऊन स्वतः त्यांनी पौरोहित्य केले. त्यांना गायत्री मंत्र दिला.

दीनबंधु ह्या सत्यशोधक मुखपत्रात जीवनाच्या अखेरपर्यंत त्यांनी अनेक वादळी लेख लिहिले. लोकहितवादींच्या धारदार शतपत्रांत त्यांनी भरच घातली. जोतीराव फुले व राजारामशास्त्री यांच्या काही प्रतिपादनात व कृतींत साम्य आढळते. स्त्रियांची सुधारणा व सुशिक्षण यासंबंधानेही शास्त्रीबोवांनी प्रयत्न केले. राजारामशास्त्री यांच्या पत्नी सुंदरबाई प्रेमळ व कष्टाळू होत्या. त्यांना एकुलती एक मुलगी होती ती १८९७ साली वारली. चुलत भावाला राजारामशास्त्र्यांनी पुत्रासमान मानले होते तोही १९०७ साली वारला. संस्कृतचे विद्वान असूनही त्यांना मराठी बोलभाषेचा विलक्षण अभिमान होता. मुंबई येथे ४ जानेवारी १९०८ रोजी राजारामशास्त्रींचे निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



**पनवेल : आपटे गावातील पुरातन शिवमंदिराची इन्फिनीटी फाउंडेशनच्या सदस्यांनी साफसफाई करून व दीपोत्सव साजरा केला.**

## आरोग्य प्रहर

# नारळ पाणी पिण्याचे शरीरावर होणारे परिणाम

भारतात सर्वत्र नारळ मिळतात. देशात मोठ्या प्रमाणावर लोक नारळ पाण्याचे सेवन करतात. नारळ पाणी फक्त चवीलाच गोड नसते, तर त्यामुळे अनेक फायदेही मिळतात. कमी कॅलरीज आणि कमी फॅट फूल आहार म्हणून नारळ पाण्याचे सेवन केले जाते. कोणीही आजारी असल्यास या व्यक्तीला पाहण्यासाठी लोक नारळ पाणी घेऊन जातात.



शरीरातील पाण्याची कमतरता दूर करण्यासाठी किंवा कोणत्याही आजारासाठी डॉक्टर नेहमी नारळ पाणी पिण्याचा सल्ला देतात. नारळाच्या पाण्याने शरीराला अनेक फायदे मिळतात. सध्या हिवाळ्याचे दिवस सुरू आहेत. थंडीच्या या दिवसांमध्ये बहुतेक लोकांना स्कीनशी संबंधित अनेक समस्यांचा सामना करावा लागतो, अशावेळी या समस्यांपासून सुटका मिळवण्यासाठी नारळ पाणी फायदेशीर ठरते, पण नारळाचे पाणी दररोज प्यायल्याने शरीरावर कोणते परिणाम होतात तुम्हाला माहिती आहे का? याच प्रश्नाचे उत्तर गुरुग्राम नारायण हॉस्पिटलच्या आहारतज्ज्ञ मोहिनी डोंगरे यांनी दिले आहे.

आहारतज्ज्ञांनी सांगितल्यानुसार नारळ पाणी पिणे आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. नारळाच्या पाण्यात इलेक्ट्रोलाइट्स, लॉरिक सिड, पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि झिंक भरपूर प्रमाणात असते, जे आरोग्यासाठी खूप फायदेशीर असतात. नारळाच्या पाण्यात पोटॅशियम असते, जे कॅलरीज कमी करण्यास मदत करते. नारळ पाणी प्यायल्याने रक्तदाब नियंत्रणात राहतो, कारण त्यात पोटॅशियम असते, जे रक्तदाब नियंत्रित ठेवते. त्याचप्रमाणे रक्तातील कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रित ठेवण्यास आणि हृदयाचे आरोग्य चांगले राखण्यास नारळ पाणी मदत करते. याव्यतिरिक्त थकवा किंवा तणाव जाणवत असेल तर नारळ पाणी प्यायल्याने रिलॅक्स वाटते.

नारळ पाणी प्यायल्याने शरीराला अनेक फायदे आहेत, परंतु हे पौष्टिक पेय असले तरी संयम महत्वाचा आहे, कारण जास्त प्रमाणात नारळाचे पाणी सेवन केल्याने कॅलरी आणि साखरेचे प्रमाण वाढू शकते, ज्यामुळे वजन व्यवस्थापनावर परिणाम होऊ शकतो. शरीरात नारळाच्या पाण्याचे प्रमाण जास्त वाढले, तर पोटाच्या समस्येने ग्रस्त लोकांना अतिसाराची समस्या उद्भवू शकते. नारळाच्या पाणी जास्त प्रमाणात सेवन केल्याने एखाद्या व्यक्तीमध्ये हायपरक्लेमिया (पोटॅशियम टॉक्सिसिटी) होऊ शकतो. त्यामुळे आहारतज्ज्ञ म्हणतात, आहारात कोणताही बदल करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला नक्की घ्या!

# रायगड पोलिसांचे मिशन ऑलआउट

## ◆ गावागावात पथकाची गस्त; गुन्हेगारी प्रकारांवर करडी नजर

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रायगड पोलिसांनी मिशन ऑलआउट मोहीम हाती घेतली. अवैध धंद्यांवर आळा बसविण्यासाठी, तसेच कायदा व सुव्यवस्था बिघडविणाऱ्यांवर अंकुश ठेवण्यासाठी हे मिशन राबविले. या झाडाझडतीमध्ये दारु विक्री करणाऱ्यांपासून अनेक हॉटेलांवर छापे टाकण्यात आले, तसेच वाहतुकीचे नियम मोडणारे व काही संशयितांविरोधातदेखील कारवाई करण्यात आली. या मिशनमुळे अवैध धंदे चालविणाऱ्यांना दणका देण्यात आला.



जिल्ह्यात सात विधानसभा मतदारसंघांमध्ये निवडणूक होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर रायगड पोलीस कामाला लागले आहे. गावागावांत रुटमार्च घेऊन गैरप्रकार करणारे व कायदा व सुव्यवस्था बिघडविणाऱ्यांवर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात मिशन ऑलआऊट सुरू करण्यात आले. हे मिशन जिल्ह्यातील अलिबाग, मांडवा अशा एकूण २८ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत राबविण्यात आले.

गावागावांत जाऊन पोलिसांनी माहिती घेण्यास सुरुवात केली. हॉटेल, लॉज, रिसॉर्टची तपासणी करण्यात आली. दारुचा साठा ठेवणारे, वाहतुकीचे नियम मोडणारे तसेच काही संशयितांचीदेखील पाहणी पोलिसांनी या मिशनदरम्यान केली. त्यामध्ये दारु विक्री करणारे, न्यायालयात हजर न राहणारे, दारु पिऊन वाहन चालविणारे अशा अनेकांवर रायगड पोलिसांनी कारवाई केली. त्यामध्ये अलिबाग उपविभागीय अधिकारी विनित चौधरी यांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या मांडवा पोलिसांनी सात हॉटेल, लॉज व रिसॉर्ट, दारु पिऊन वाहन चालविणारे तिघे, वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणारे चौघे, तसेच वॉरंट आणि समन्स बजावणी असणाऱ्या चार जणांविरोधात कारवाई केली.

पोलिसांनी ७८ संशयित वाहनांची तपासणी केली. त्यामध्ये ९८ जणांना ताब्यात घेऊन त्यांच्याविरोधात कारवाई केल्याची माहिती समोर येत आहे. ऐन निवडणुकीत पोलिसांच्या मिशन ऑलआऊटमध्ये अवैध धंदे चालविणारे, बेकायदेशीररित्या दारु विक्री व निर्मिती करणाऱ्यांना दणका मिळाला आहे.

> **निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गुन्हेगारीवर अंकुश ठेवण्यासाठी मिशन ऑलआऊट सुरू करण्यात आले आहे. संशयित वाहनांची तपासणी करण्याबरोबरच हॉटेल, लॉज याठिकाणीदेखील जाऊन पाहणी केली. वॉरंट आणि समन्स काढण्यात आलेल्या आरोपींना शोधण्यातदेखील यश आले आहे.**
>
> **–विनित चौधरी, उपविभागीय पोलीस अधिकारी, अलिबाग**

# महेंद्र दळवींना निवडून द्यायची जबाबदारी माझी –खासदार तटकरे

## चणेरा येथे महायुतीची प्रचार सभा



**धाटाव : प्रतिनिधी**

अलिबाग–मुरूड मतदारसंघातील अनेक विकासकामे आमदार महेंद्र दळवी यांच्या माध्यमातून झाली आहेत. त्यामुळे त्यांचा विजय निश्चित आहे. त्यांना निवडून आणायची जबाबदारी माझी, असा दावा खासदार सुनील तटकरे यांनी केला.

अलिबाग–मुरूड मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रचारार्थ रोहा तालुक्यातील चणेरा येथे शनिवारी (दि. ९) सभा घेण्यात आली. या वेळी होते.

या वेळी आमदार महेंद्र दळवी यांनी, गेल्या अनेक वर्षांपासून अलिबाग–मुरूड–रोहा येथील जनतेची कामे प्रामाणिकपणे करीत आलो. गेल्या पाच वर्षांपासून येथील जनतेशी ऋणानुबंध ठेवले. या माझ्या मतदारसंघात खासदार सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शकाखाली तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार त्यांच्या माध्यमातून असंख्य कोट्यावधींची विकासकामे केली आहेत. विरोधकांकडे कोणतेही मुद्दे नसल्यामुळे वाटेल ते आता बोलायला लागलेत. येथील जनताच येत्या २० तारखेला महायुतीच्या उमेदवाराला म्हणजे धनुष्यबाण त्या चिन्हाला बटन दाबून मला प्रचंड मतांनी विजय करतील यात माझ्या मनात काही शंका नाही, असा दावा केला.

# आमदार रविशेठ पाटील यांचा विजय निश्चित -अ‍ॅड. आरती गुप्ता

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील विधानसभा निवडणुकीत महायुतीतील भाजपचे उमेदवार रविशेठ पाटील निवडून येणार असल्याचा दावा अ‍ॅड. आरती गुप्ता यांनी केला आहे.

त्यांनी सांगितले की, महायुतीतील भाजपचे उमेदवार आमदार रविशेठ पाटील यांच्या प्रचाराला मिळणारा उस्फूर्त प्रतिसाद आणि त्यांनी आमदार असताना केलेल्या विकासकामांच्या जोरावर पेण–सुधागड मतदारसंघात महायुतीचे उमेदवार निवडून येतील याबद्दल तिळमात्र शंका नाही, असा दावाही त्यांनी केला.

महायुतीच्या प्रचारामध्ये अनेक कार्यकर्ते आणि स्थानिक नेते सक्रियपणे सहभागी झाले आहेत. त्यांनी मतदारांशी संवाद साधत, आमदार रविशेठ पाटील यांच्या कार्यकाळातील महत्त्वाच्या प्रकल्पांची माहिती दिली आहे. त्यामुळे मतदारांचा विश्वास वाढला आहे आणि सुधागड तालुक्याचा सर्वांगीण विकास होईल, असा विश्वास मतदारांमध्ये निर्माण झाला असल्याचा दावा महायुतीच्या कार्यकर्त्यांकडून केला जात आहे.

महायुतीच्या उमेदवारांनी रस्ते, पाणीपुरवठा, यांसारख्या क्षेत्रांमध्ये केलेल्या विकासकामांमुळे मतदारांमध्ये महायुतीबद्दल सकारात्मक भावना निर्माण झाली आहे, असे अ‍ॅड. आरती गुप्ता यांनी सांगितले.



**मुरूड : हिवाळी पर्यटन हंगाम सुरू झाल्याने दिवाळीनंतर मोठ्या संख्येने पर्यटक मुरूडमध्ये दाखल होत आहेत. येथील प्रसिद्ध जंजिरा किल्ला पाहण्यासाठी पर्यटकांच्या रांगा लागत आहेत.** (छाया : सुधीर नाझरे)

# माथेरानमधील सार्वजनिक स्वच्छतागृहात दुर्गंधी

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान पर्यटनस्थळी सध्या पर्यटकांची मोठी गर्दी होत आहे. याठिकाणी येणारे पर्यटक हे स्वच्छता कर भरून प्रवेश करीत असतात, मात्र माथेरानच्या कपाडिया मार्केटमधील स्वच्छतागृहाची तसेच रेल्वे स्टेशन मागील स्वच्छतागृहाची प्रचंड दूरवस्था झाली असून पर्यटकांसह स्थानिकांनाही दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे.



माथेरानला पर्यटन हाच एकमेव व्यवसाय असल्याने याठिकाणी येणाऱ्या पर्यटकांकडून नगरपालिका प्रवासी कर आकारत असते. प्रवासी कराच्या बदल्यात त्यांना सर्व प्राथमिक सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी पालिकेकडे असते.

यामध्ये शहरतील अनेक ठिकाणी स्वच्छतागृह तसेच बसण्यासाठी बाकडे, पिण्याचे पाणी आणि अत्यावश्यक गरजेच्या वेळी रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्याची जबाबदारी अशा प्रकारच्या प्राथमिक सुविधांची जबाबदारी माथेरान पालिकेची असते, मात्र नगरपालिकेच्या माध्यमातून उभारण्यात आलेल्या स्वच्छतागृहांची देखभाल व्यवस्थित ठेवली जात नसल्याने त्या स्वच्छतागृहांची दूरवस्था होऊन त्याठिकाणी दुर्गंधी पसरली असल्याची माहिती माजी नगरसेवक संदीप कदम यांनी दिली.

सध्या येथे दिवाळी हंगाम सुरू असून पर्यटकांची गर्दी आहे. मुख्य दिवाळी हंगामात मुख्य बाजारपेठेतील कपाडिया मार्केट येथे असलेले स्वच्छतागृह आणि रेल्वेस्टेशन मागील बाजूस असलेले स्वचछतागृहांची दररोज साफसफाई होत नसल्याने दुर्गंधी आणि अस्वच्छता पसरली आहे.

ही स्वच्छतागृहे रहदारीच्या ठिकाणी असल्याने पर्यटक याचा वापर करीत असतात, मात्र स्वचछतागृहे स्वचछ नसल्याने पर्यटक याबाबत नाराजी व्यक्त करीत आहेत. मुख्य वर्दळीच्या ठिकाणी असलेल्या स्वचछतागृहाची तत्काळ स्वचछता करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# संजय गुंजाळ यांना जीवन गौरव पुरस्कार



**मुरूड** : कोकण मराठी साहित्य परिषदेचे अध्यक्ष संजय गुंजाळ यांना सर्वद फाउंडेशनच्या वतीने त्यांच्या सांस्कृतिक, सामाजिक कार्याची दखल घेत जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

पुरस्काराचे वितरण १८ जानेवारी २०२५ रोजी अभय इंटरनॅटशनल स्कूल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, विक्रोळी पूर्व मुंबई या ठिकाणी होणार आहे. त्यांची जीवन गौरव पुरस्कारासाठी निवड जाहीर होताच सर्वद फाउंडेशन मुंबईच्या अध्यक्ष डॉ.सुचिता पाटील व ओमकार देशमुख यांनी अभिनंदन केले आहे.

# अलिबाग क्रिकेट अकॅडमीचा शुभारंभ

**अलिबाग : प्रतिनिधी**

तालुक्यातील किहीम येथील राजा शिवछत्रपती क्रीडांगणावर अलिबाग क्रिकेट अकॅडमीचा शुभारंभ करण्यात आला. विभागातील युवा क्रिकेट खेळाडूंसाठी या क्रिकेट अकॅडमीची सुरुवात करण्यात आली आहे.

क्रिकेट अकॅडमीच्या माध्यमातून ऋषिकेश राऊत यांच्या देखरेखीखाली युवा खेळाडूंची प्रतिभा वाढवण्यासाठी काम करणार असून क्रिकेट अकॅडमीमध्ये खेळाडूंना तज्ज्ञ प्रशिक्षकांमार्फत उत्कृष्ट प्रशिक्षण देण्यात येणार आहे. शालेय शिक्षणाबरोबर खेळालाही तितकेच महत्त्व आहे, तरी विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या खेळामध्ये जिद्द, चिकाटी व मेहनतीच्या जोरावर यश संपादन करावे, क्रीडा स्पर्धेच्या माध्यमातून करिअर करण्याच्या विविध संधी उपलब्ध आहे. अलिबाग क्रिकेट अकॅडमीच्या वतीने विविध वयोगटातील मुलांसाठी लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करून त्यांना हक्काचे व्यासपीठ निर्माण करून दिले जाणार आहे. या क्रिकेट अकॅडमीमध्ये मुलांच्या बरोबरीने मुलींनादेखील प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

अलिबाग क्रिकेट अकॅडमीच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून माजी रणजीपटू आनंद दळवी, किहीम ग्रामपंचायत सरपंच प्रसाद गायकवाड, उपसरपंच मिलिंद पडवळ, ग्रामपंचायत सदस्य, रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सचिव प्रदिप नाईक, उपाध्यक्ष राजेश पाटील, सहसचिव जयंत नाईक, माणुसकी प्रतिष्ठान अध्यक्ष डॉ. राजाराम हुलवान, लायन्स हेल्थ फाऊंडेशन व्हाईस चेअरमन नितीन अधिकारी, अलिबाग तालुका क्रिकेट असो.सचिव प्रकाश पावसकर, अलिबाग तालुका क्रिकेट असो. सदस्य अभय घरत, आरपीएल सहसचिव संदीप जोशी, प्रीतम पाटील, प्रसाद पिळणकर, राकेश म्हात्रे तसेच राजा शिवछत्रपती किहीम मंडळाचे सर्व प्रतिनिधी व खेळाडू उपस्थित होते.



# पोलादपूर शहरात स्नेहल जगतापांची रॅली

**पोलादपूर : प्रतिनिधी**

शहरातील तांबडभुवन येथील संपर्क कार्यालयापासून महाविकास आघाडीच्या उमेदवार स्नेहल माणिक जगताप यांनी मतदार संपर्क रॅली काढली.

रॅलीमध्ये महाडचे ज्येष्ठ नेते चंद्रकांत जाधव, माजी सभापती दिलीप भागवत, शैलेश सलागरे, माजी राजिप सदस्य अनिल नलावडे व मुरलीधर दरेकर, शिवसेना उपजिल्हा प्रमुख पदमाकर मोरे, युवानेते धनंजय देशमुख, चेतन पोटफोडे, माजी नगराध्यक्ष अश्विनी गांधी, निलेश सुतार, बच्चू पवार, माजी नगरसेविका शुभांगी चव्हाण, विद्यमान नगरसेवक गायकवाड, श्रावणी शहा, गरूड, स्वप्नील भुवड, निखील कापडेकर, माजी सरपंच अमोल भुवड, गोळेगणी सरपंच शेखर येरूणकर, धामणदिवी सरपंच क्षमता बांद्रे, काटेतळीचे माजी सरपंच शंकर वाडकर, कोतवालचे माजी सरपंच महेश दरेकर, तालुका संघटक अजय सलागरे उपस्थित होते.



# मुरूडमध्ये हॉर्नबील पक्ष्याचा मुक्त विहार

**मुरूड : प्रतिनिधी**

शहरानजीक मोठमोठ्या नारळ, सुपारीच्या बागायती असून येथील उंच अशा नारळाच्या झाडावर हॉर्नबिल पक्षाचा मुक्त विहार होत असल्याचे पहायला मिळत आहे.

सुपेगाव येथे ५४ चौ. किमी. अंतरात फणसाड अभयारण्य असून येथे आतापर्यंत विविध पक्षांच्या ११४ प्रजाती आढलून आलेल्या आहेत, परंतु हॉर्नबिल पक्षी हे अभयारण्य सोडून उंच अशा नारळाच्या झाडावर दिसू लागल्याने पक्षीप्रेमींनी आनंद व्यक्त केला आहे. हा पक्षी मुख्यतः भारतीय उपखंड, मुख्यभू आग्नेय आशिया, व द्वीपीय आग्नेय आशियातले सुमात्रा बेट या भूप्रदेशांत आढळतो. याला मराठीमध्ये मलबारी धनेश, गरुड धनेश किंवा राज धनेश या नावांनीही ओळखले जाते.



अतिशय सुंदर रंगांनी हा पक्षी लक्ष वेधून घेतो. विविध प्रकारची फळे हे त्याचे मुख्य खाद्य आहे. झाडाच्या ढोलीत तो घरटे बांधतो व चिखलाने झाकून टाकतो व पिल्लांसाठी केवळ अन्न देता येईल एवढी एकच लहान उभी फट ठेवतो. या फटीतून पिल्लांना चारा पुरवला जातो.


या पक्ष्यांची चोच फार मोठी व सिंगासारखी असल्यामुळे यांना इंग्रजी भाषेत हॉर्नबिल हे नाव दिलेले आहे. या पक्ष्यांचे एकंदर स्वरूप असामान्य असते. ब्यूसेरॉटिडी या पक्षीकुलात यांचा समावेश केलेला आहे. याबाबत पक्षीप्रेमी संदीप घरत यांनी सांगितले की, हॉर्नबिल पक्षी आपल्या फणसाड अभयारण्य त्याचप्रमाणे गारंबी परिसर व उंच अशा झाडावर राहणे पसंत करतो.

जेथे खाद्य मिळते तेथे त्याचे वास्तव्य जास्त दिवस दिसते. त्याच्या लांब चोचिमुळे हा पक्षी सर्वांचा आवडता आहे. आकर्षक रंग विशिष्ट आवाज काढण्याची पद्धत त्यामुळे या पक्षास ओळखणे फार सोपे जाते. या पक्षाची प्रजाती वाढत असल्याने त्यांची संख्या फणसाडमध्ये वाढत आहे.

# बोर्लीपंचतन शहराला वाहतूक कोंडीचे ग्रहण

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील बोर्लीपंचतन शहराच्या मुख्य रस्त्यावर वाहतूक कोंडी दररोज होत आहे. एसटी स्टँड ते दिवेआगर फाट्यापर्यंत ही वाहतूक कोंडी पाहायला मिळते. परिसरातील रहिवासी आणि व्यावसायिकसुद्धा त्यामुळे त्रस्त झाले आहेत.



श्रीवर्धनला जाण्यासाठी हा मुख्य रस्ता आहे. सध्या पर्यटन हंगाम सुरू झाला आहे, तसेच आजूबाजूच्या गावातील ग्रामस्थ खरेदीसाठी बोर्लीलाच येतात. शाळा व महाविद्यालयात जाणारे विद्यार्थी याच मार्गाने जातात. व्यापाऱ्यांकडे येणाऱ्या किराणा मालाचे ट्रक मुख्य रस्त्यात तासनतास मुख्य बाजारपेठ रस्त्यात उभे राहात असल्याने येथील लहान वाहनांसह पादचाऱ्यांची वाट काढण्यात दमछाक होत आहे, मात्र, अद्याप बोर्ली शहरातील वाहतूक कोंडीवर उपाययोजना करण्यात आली नाही. विकेंडला तर पर्यटकांच्या गाड्यांच्या रांगा लागलेल्या दिसतात. त्यांना या ढिसाळ नियोजनाचा फटका बसतो. रस्त्यावरील बेकायदा पार्किंगमुळे वाहतूक कोंडीत आणखीच भर पडते.

# टपऱ्या, दुकानांमध्ये गांजा, दारूविक्री

## महापे एमआयडीसीत पोलिसांची छापेमारी; आरोपींवर गुन्हा दाखल





**नवी मुंबई : बातमीदार**

अमलीपदार्थविरोधी पथकाने अडवली भुतवली, महापे एमआयडीसी परिसरात टपऱ्या, दुकानांवर छापे टाकून गांजासह देशी-विदेशी दारू जप्त करून पाच जणांवर रबाळे एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. एका कारवाईदरम्यान दुकानदाराने विरोध केल्याने पोलिसांना बळाचा वापरदेखील करावा लागला.

महापे एमआयडीसी परिसरात टपऱ्यांसह दुकानांमध्ये बेधडक दारू, गुटखा विक्री होत असल्याची माहिती अमली पदार्थविरोधी पथकाला मिळाली होती. त्यावरून वरिष्ठ निरीक्षक संदीप निगडे यांच्या पथकाने अडवली-भुतवली गावपरिसरातील अमली पदार्थ विकणाऱ्या टपऱ्या व दुकानदारांची माहिती मिळवली होती. या सर्व ठिकाणी अमली पदार्थविरोधी पथकाने गुरुवारी सलग छापे टाकले. त्यात टपऱ्या व दुकाने अशा चार ठिकाणी विक्रीसाठी ठेवलेला गुटखा, गांजा व देशी-विदेशी दारू मिळून आली. सुमारे दीड लाखाचा हा सर्व मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे. तर या प्रकरणी झोया शहा, राजू शहा, पप्पू पाठक, विशाल चौबे व जहाँगीर अली यांच्यावर रबाळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.कारवाईदरम्यान जहाँगीर अली याच्या दुकानात कारवाई करताना त्याने व त्याच्या नातेवाइकांनी पोलिसांना विरोध करून आरडाओरडा करण्यास सुरुवात केली.

गुन्हे शाखा पोलिसांनी अधिक पोलिसांना बोलावून त्याच्यावर कारवाई केली. मागील अनेक वर्षांपासून संबंधितांकडून टपऱ्या, दुकानांमध्ये उघडपणे अमली पदार्थ विकले जात असल्याचे समजते. ठोस कारवाईअभावी त्यांना पाठबळ मिळत गेल्याने अखेर गुन्हे शाखा पोलिसांनी त्या ठिकाणी कारवाई केली.

# मतदारसंघाचा विकास करणाऱ्या आमदार महेश बालदींना विजयी करा



## सचिन तांडेल यांचे आवाहन

**उरण : रामप्रहर वृत्त**


उरण विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीत आमदार महेश बालदी यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन भाजपचे वासांबे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष सचिन तांडेल यांनी केले आहे.

उरण विधानसभा क्षेत्रातील इमानदार नेतृत्व करणारे हक्काचे आमदार म्हणून ओळख असणारे, उरण-पनवेल-खालापूर मतदार संघात विकासकामे करून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत ते पोहचवण्याचे कसब असणारे व्यक्तिमत्व म्हणजे आमदार महेश बालदी यांचा जन्म उरण शहरातील असून, त्यांचे शिक्षण येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले आहे.

लहानपणापासून सामाजिक क्षेत्राची आवड आणि त्याला लाभलेले राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्कार यामुळेच जनसेवेच्च व्रत घेऊन तरुण वयातच राजकीय क्षेत्रात पदार्पण झालेल्या या नेतृत्वाने जमेल तेथे हात जोडून अन्यथा वेळ पडल्यास संघर्ष करून, या संघर्ष योध्याने जनसामान्यांचे काम अविरतपणे सुरू ठेवले. या दमदार कार्यशैलीने एक सामान्य भारतीय जनता पक्षाचा कार्यकर्ता चार वेळा उरण नगर परिषदेचा नगरसेवक, त्यानंतर नगराध्यक्ष, देशातील पहिल्या क्रमांकावर असलेल्या जेएनपीए बंदराचे विश्वस्त आणि कार्यकर्त्यांच्या पाठबळावर व सामान्य मतदारांच्या आशीर्वादावर आत्ता उरण विधानसभा मतदार संघावार मागील पाच वर्षे प्रवास पूर्ण केला आहे.

उरण, पनवेल, खालापूरसह संपूर्ण रायगड जिल्ह्यात भारतीय जनता पक्ष वाढविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली असून जाती, धर्मनिरपेक्ष विचार आणि विकासाचा दृष्टिकोन यामुळे सर्वच जाती धर्मांच्या नागरिकांनी त्यांना साथ दिली आहे. प्रत्येकाला मदत करणारा आणि हाकेला धावून जाणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख निर्माण झाल्याने केंद्रापासून ते राज्य सरकार मधील विविध मंत्र्यांचे यांच्यासमवेत जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित आहेत. उरण मतदार संघात विकास प्रकल्प आणि त्याला लागणाऱ्या परवानग्या व विकास निधी खेचून आणून ते पूर्णत्वास नेण्याची त्यांची खासियत सर्वांनाच ठाऊक आहे. त्यांच्या या कार्य कुशल पद्धतीमुळे आणि खंबीर नेतृत्वामुळे उरण, पनवेल आणि खालापूर येथील झालेला अभूतपूर्व विकास यामुळे होऊ घातलेल्या उरण विधानसभा निवडणुकीत आमदार महेश बालदी यांना पुन्हा एकदा मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन भाजपाचे वासांबे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष सचिन तांडेल यांनी केले आहे.

# रेल्वेतल्या गर्दीत आरपीएफ जवानाचाच मोबाईल चोरला; त्रिकुटावर गुन्हा



**नवी मुंबई : बातमीदार**

रेल्वेतल्या गर्दीत आरपीएफ जवानाचाच मोबाइल चोरल्याची घटना घडली, परंतु जवानाच्या प्रसंगावधानामुळे तीन चोरटे हाती लागले असून, त्यात दोन अल्पवयीन मुलांचा समावेश आहे. त्यांच्यावर वाशी रेल्वे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

आरपीएफचे सहायक पोलीस उपनिरीक्षक रतनलाल मीना (वय ४१) यांच्यासोबत हा प्रकार घडला. मुलुंड रेल्वेस्थानकात त्यांची नियुक्ती असून ते कामानिमित्त साध्या गणवेशात रेल्वेने गोवंडीला गेले होते. या वेळी रेल्वेत गर्दी असल्याची संधी साधून गोवंडी स्थानकात एकाने त्यांच्या खिशातील मोबाइल चोरण्याचा प्रयत्न केला, परंतु रतनलाल यांनी तो खेचणाऱ्याला पकडले असता त्याने चोरलेला मोबाइल दुसऱ्या साथीदाराकडे देताच रेल्वेतून उडी मारून पळ काढला.

यावेळी गस्तीवर असलेल्या आरपीएफ जवानांनी पळणाऱ्यांना ताब्यात घेतले. त्यांना वाशी रेल्वे पोलीस ठाण्यात आणले असता दोघे अल्पवयीन असल्याचे समोर आले, तर एका आरोपीचे नाव शुभम मंडलिक (वय २०) असल्याचे निष्पन्न झाले.

# राजू शिंदे भाजपचे जिल्हा प्रवक्ते



**नवी मुंबई :** नुकतेच राष्ट्रवादी शरद पवार गटाला सोडचिठ्ठी देऊन भाजपत प्रवेश केलेले वाशी विभागातील माजी नगरसेवक राजू शिंदे यांना भाजपाने जिल्हा प्रवक्तापद दिले आहे.

राजू शिंदे हे अभ्यासू नेते म्हणून ओळखले जातात. राष्ट्रवादीत असतानादेखील ते पक्षाचे प्रवक्ते होते. शहराबद्दल पालिकेच्या कारभाराबद्दल सातत्याने ते अभ्यासपूर्णबाबी समोर आणत असतात. तसेच विरोधकांवरदेखील मुद्देसुद मांडणी करून प्रहार करण्याची क्षमता राजू शिंदे यांच्यात आहे.

ही बाब लक्षात घेत भाजपचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी ९ नोव्हेंबर रोजी माजी नगरसेवक तथा माजी आरोग्य सभापती विक्रम (राजू) शिंदे यांना भारतीय जनता पक्ष, नवी मुंबई जिल्हा प्रवक्ता म्हणून नियुक्त केले आहे.

# मॉर्निंग वॉक करतानाही प्रचार



**नवी मुंबई : बातमीदार**

विधानसभा निवडणुकीचा प्रचार रंगू लागला आहे. ऐरोली आणि बेलापूरमधील प्रमुख उमेदवारांसह अपक्षांनी प्रचारासाठी विविध पर्यायांचा अवलंब सुरू केला आहे. प्रचार फेऱ्यांच्या माध्यमातून मतदारांशी संपर्क साधण्याचे विविध स्तरांवर प्रयास केले जात आहेत.

सकाळी मॉर्निंग वॉकला येणाऱ्या नागरिकांच्याही भेटीगाठी सुरू झाल्या आहेत. प्रमुख उमेदवार आपल्या फौजफाट्यासह भल्या पहाटे बाहेर पडून मॉर्निंग वॉकला आलेल्या मतदारांशी संवाद साधताना दिसत आहेत.

वाशी येथील मिनी सीशोअर, सागर विहार, एनएमएसएचे मैदान, उद्याने, पामबीच मार्ग, नेरूळ ज्वेल ऑफ नवी मुंबई, बेलापूर येथील सरोवर विहार, पारसिक हिल टेकडी तसेच घणसोली पामबीच मार्ग येथे सकाळी नागरिक फिरायला येतात. या मतदारांवर उमेदवारांनी लक्ष केंद्रित केले आहे. या ठिकाणांना भेट देऊन मतदारांशी संवाद साधला जात आहे. उमेदवारांसोबत त्यांचे कार्यकर्तेही स्वच्छ हवेच्या शोधात आलेल्या नागरिकांना येथेही प्रचार सहन करावा लागत आहे.

# विधानसभा निवडणुकीसाठी भाजप महिला मोर्चाची बैठक

## पदाधिकाऱ्यांसोबत संवाद साधून मार्गदर्शन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर भारतीय जनता पक्ष महिला मोर्चाच्या कोकण प्रभारी सुलक्षणा सावंत यांच्या प्रमुख उपस्थितीत महत्त्वपूर्ण बैठक रविवारी (दि.१०) झाली.

मार्केट यार्डमधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या बैठकीत सुलक्षणा सावंत यांनी महिला मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांसोबत संवाद साधून विविध विषयांवर चर्चा करून त्यांना मार्गदर्शन केले.

या वेळी माजी पं. स. सदस्य रत्नप्रभा घरत, महिला मोर्चाच्या उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस ॲड. संध्या शारबिद्रे, पनवेल तालुका अध्यक्षा कमला देशेकर, तालुका सरचिटणीस ॲड. प्रतिभा भोईर, शिल्पा म्हात्रे, उपाध्यक्षा समिना साठी, वर्षा नाईक, माजी नगरसेविका कल्पना ठाकूर, ज्योती भोपी, कुंदा मेंगडे यांच्यासह महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.

# आमदार मंदा म्हात्रेंचा बेलापूरमध्ये प्रचार



**नवी मुंबई : बातमीदार**

बेलापूर विधानसभा क्षेत्रामध्ये भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, आरपीआय, पीआरपी आणि मित्रपक्ष महायुतीच्या अधिकृत उमेदवार आमदार मंदा म्हात्रे यांच्या प्रचार्थ बेलापूर मंडळमधून झालेल्या प्रचार रॅलीला जनतेचा जोशपूर्ण प्रतिसाद लाभला.

आमदार मंदा म्हात्रे यांचे नवी मुंबईमध्ये झालेल्या विकास कार्यावर असलेला जनतेचा अतूट विश्वास आणि समर्थनाचे प्रतिक ठरले. नवी मुंबईमध्ये सामाजिक बांधिलकी जपत अहो दिवस-रात्र काम करणाऱ्या आमदार मंदा म्हात्रे यांचा १५१ बेलापूर विधानसभा मतदारसंघ निवडणुकीच्या अनुषंगाने झंजावती प्रचार दौरा सुरू झाला. त्यानुसार बेलापूर मंडळसह सीवूड्समध्ये ही प्रचार रॅली पार पडली. प्रचार रॅलीला जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. तसेच तरुणांसह ज्येष्ठ नागरिकांनी या रॅलीत सहभाग घेतला.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांना १५१ बेलापूर विधानसभा मतदार संघातून सलग तिसऱ्यांदा बहुमतांनी विजय करण्यसाठी येत्या २० नोव्हेंबर रोजी कमळ निशाणी समोरील बटण दाबून विजयी करण्याचे आवाहन मतदारांना करण्यात आले.

# स्वीप कार्यक्रमांतर्गत सामूहिक मतदार प्रतिज्ञा



**नवी मुंबई : बातमीदार**

राज्य निवडणूक आयोगाच्या वतीने स्वीप कार्यक्रमांतर्गत ८ ते १९ नोव्हेंबर या कालावधीत मतदार जागरूकतेविषयी विविध उपक्रम राबविण्याचे वेळापत्रक प्राप्त झाले असून त्या अंतर्गत महापालिका मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्यासमवेत उपस्थित विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी यांनी मतदार प्रतिज्ञा सामुहिकरित्या ग्रहण केली. केवळ तोंडी प्रतिज्ञा न घेता तिचे पालन करावे व इतरांनाही मतदान करण्यासाठी प्रोत्साहित करावे असे आयुक्तांनी यावेळी सांगितले.

आपण आपल्या अधिकारांबाबत जितके जागरूक असतो तितकेच आपल्या कर्तव्याबाबतही जागरूक असणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त करीत नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी २० नोव्हेंबर रोजी प्रत्येकाने लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान करावे तसेच आपल्या नातेवाईक, परिचितांनाही मतदान करण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे सांगितले.

या वेळी अतिरिक्त आयुक्त सुनील पवार व डॉ.अमोल शिंदे, प्रशासन विभागाचे उपआयुक्त शरद पवार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यवान उबाळे, मुख्य लेखा परीक्षक जितेंद्र इंगळे, उपआयुक्त किसनराव पलांडे व संतोष वारूळे, महापालिका सचिव चित्रा बाविस्कर, सहा.आरोग्य अधिकारी डॉ.रत्नप्रभा चव्हाण व अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी बोलताना जिल्हा निवडणूक कार्यालयामार्फत नियुक्त नवी मुंबईतील १५० ऐरोली व १५१ बेलापूर या दोन्ही विधानसभा मतदारसंघाचे स्वीप नोडल अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांनी निवडणूक कार्यालयांप्रमाणेच आयुक्त महोदयांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने स्वीप अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या व नियोजित असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. मतदानाची टक्केवारी वाढविण्याचे उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून पोस्टर्स, होर्डींग, बॅनर्स, कलावंतांचे मतदान करावे असे आवाहन करणाऱ्या व्हिडिओ चित्रफिती, सोशल मिडिया पोस्ट यापुढे जात थेट मतदारांपर्यंत पोहचून व त्यातही मागील वेळी कमी मतदान झाले आहे अशा भागांवर लक्ष केंद्रीत करून तेथील मतदारांना मतदान करण्याविषयी आवाहन करण्याचे सूक्ष्म नियोजन करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

याकामी महापालिकेच्या सर्व अधिकारी, कर्मचारी यांनीही आपण राहतो त्या सोसायटी, वसाहतींमध्ये मतदान जनजागृती करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशा सूचना त्यांनी केल्या.

या वेळी निवडणूक आयोगाने प्रसिध्द केलेल्या मतदान गीताचे प्रसारण करण्यात आले. आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार महानगरपालिकेच्या आठही विभाग कार्यालय क्षेत्रात स्वीप कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी उपआयुक्त दर्जाच्या अतिरिक्त स्वीप नोडल अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यांच्यामार्फत निवडणूक आयोगाने दिलेल्या वेळापत्रकानुसार मतदार जागरूकता उपक्रम राबवून जास्तीत जास्त मतदारांपर्यंत पोहचण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

महापालिका मुख्यालयाप्रमाणेच विधानसभा निवडणूक कार्यालयांमार्फतही दोन्ही मतदारसंघात विविध ठिकाणी सामुहिक मतदार प्रतिज्ञा घेण्याचे उपक्रम राबविण्यात आले.

# ऐरोलीतील शाळेला साहित्याचे वाटप



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्य महाराज यांचा पादुका दर्शन सोहळा ऐरोली येथे झाला. जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थान अंतर्गत शैक्षणिक उपक्रमांतर्गत संजिवनी विद्यालय, ईश्वरनगर या शाळेला विनामूल्य संगणक तसेच दुर्बल घटक पुनर्वसन उपक्रमांतर्गत एमबीए फाऊंडेशन, ऐरोली या संस्थेला दिव्यांग प्रशिक्षण साहित्य वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

प.पू. जगद्गुरुश्रींच्या पादुकांची ढोल ताशांच्या गजरात, टाळ मृदुंगाच्या नादात, वारकरी पथक, कलशधारी सुवासिनी, कोळी नृत्य सादर करत, कला परंपरांनी अलंकृत अशी मिरवणुक काढण्यात आली होती. या मिरवणूकीमध्ये अनेक मान्यवर सिद्ध पादुकांचे दर्शन घेण्यासाठी आले होते.

जगद्गुरुश्रीं आपल्या प्रवचनामध्ये जमलेल्या जनसमुदायाला मार्गदर्शन करत असतात, मानवी जन्म किती अमूल्य आहे जीवन सुकर होण्यासाठी आपल्यामध्ये संयम, समयसूचकता, प्रगल्भता, नेतृत्व गुण, खिलाडू वृत्ती, तुमच्यातील आत्मविश्वास, जिद्द, चिकाटी हे सर्व गुण आपोआपच विकसित होतील, असे समजावून सांगतात तसेच दिवसातून दहा मिनिटे वेळ काढा आणि आपल्या मनाला भक्तीरुपी एकाग्रतेचा व्यायाम द्या, स्वप्नात सुद्धा कोणाचे वाईट चिंतू नका या मार्गाने जा असे सांगतात.

जनम प्रवचनकार मंगल कुमार चव्हाण यांनी अतिशय सुंदर प्रवचन केले. महाप्रसादाची व्यवस्था आयोजकांनी केलेली होती. गुरुपादुका पुजनाला व दर्शनला सुमारे ५००० जनाची उपस्थिती होती. त्यानंतर सर्व भाविकांनी पादुकांचे मनाभावे दर्शन घेतले आणि पुष्प वृष्टीने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# 'साठ वर्षांवरील ज्येष्ठांना सर्व सवलती लागू करा'



**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्रा राज्यात सध्या ६५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना लागू असणाऱ्या शासनाच्या सर्व सवलती साठ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना लागू करण्यात याव्यात अशी मागणी निवृत्त माहिती संचालक देवेंद्र भुजबळ यांनी नुकतीच केली.

महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या अध्यक्षपदी अण्णासाहेब टेकाळे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सानपाडा जेष्ठ नागरिक संघातर्फे नुकताच सत्कार करण्यात आला. त्या प्रसंगी भुजबळ बोलत होते.

भुजबळ म्हणाले की, ज्येष्ठ नागरिक होण्यासाठी वयाची साठ वर्षे पूर्ण होण्याची अट आहे. तर मग ज्येष्ठ नागरिकांना मिळणाऱ्या सवलती मिळण्यासाठी ६५ वर्षे वयाची अट आहे ,या विसंगती कडे त्यांनी लक्ष वेधले. आपल्या सत्काराला उत्तर देताना अण्णासाहेब टेकाळे यांनी भुजबळ यांनी केलेल्या सूचनेचा संदर्भ देऊन सांगितले की, ६५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना लागू असणाऱ्या शासनाच्या सर्व सवलती ६० वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना लागू करण्यात याव्यात, अशी मागणी सरकारकडे लवकरच करण्यात येईल. तसेच दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील ज्येष्ठ नागरिकांना सरकार कडून दरमहा मिळणारी १५०० रुपयांची पेन्शन तीन हजार रुपये करण्यात यावी, अशी ही मागणी सरकारकडे करण्यात येईल. महाराष्ट्रात सध्या एक कोटी ४० लाख ज्येष्ठ नागरिक असून त्यापैकी ५३ टक्के महिला आहेत तर ४७ टक्के पुरुष आहेत. एकूण ज्येष्ठ नागरिकांपैकी ४० लाखांहून अधिक ज्येष्ठ नागरिक दारिद्र्य रेषेखाली असून त्याना सरकार तर्फे दिड हजार रुपये मिळतात, अशी माहिती देऊन टेकाळे यांनी सर्व ग्रामपंचायती आणि महानगर पालिकांनी शासनाच्या धोरणानुसार ज्येष्ठ नागरिकांसाठी धडाडीने विरंगुळा केंद्रे उभारावीत, असे आवाहन करून राज्यात सर्वांत जास्त म्हणजे ३२ विरंगुळा केंद्रे नवी मुंबईत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संघाचे उपाध्यक्ष विठ्ठल गव्हाणे यांनी केले तर प्रस्तावना आणि आभार सचिव शरद पाटील यांनी मानले.

## निवडक

### विकास कॉलनी शाळेत जनजागृती



**माणगाव :** नगरपंचायत हद्दीतील राजिप विकास कॉलनी शाळेतर्फे मतदानाबाबत जनजागृती करण्यात आली. जनजागृती कायक्रमासाठी माणगाव पंचायत समितीच्या गट शिक्षणाधिकारी सुरेख तांबट, माजी केंद्रप्रमुख संजय निजापकर, शाळेच्या मुख्याध्यापिका येलवे, शिक्षिका गायकवाड येथील मुख्याध्यापिका, सर्व शिक्षकवर्ग, विद्यार्थी व ग्रामस्थांनी या मतदानाच्या जनजागृतीपर प्रभातफेरीत सहभाग दाखविला. या अंतर्गत १०० टक्के मतदान व्हावे यासाठी स्वीप कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली असून या कार्यक्रमांतर्गत शाळेने प्रभातफेरी, घोषवाक्य, रांगोळी आदी स्पर्धा घेतल्या.

### मातृभूमी परिचय शिबिर उत्साहात



**माणगाव :** वनवासी कल्याण आश्रमशाळा माणगाव येथे मातृभूमी परिचय शिबिर अत्यंत उत्साहात झाले. विद्याभारती भारतीय शिक्षा संकुल, पंचकोश गुरुकुल चिपळूण या संस्थेचे वनवासी कल्याण आश्रमशाळा माणगाव येथे मातृभूमी परिचय शिबिर ४ ते ९ नोव्हेंबर या कालावधीत झाले. या शिबिराचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते भालचंद्र खाडे, अजित शेडगे, आश्रमाचे व्यवस्थापक विलास देगावकर, मनोज कामत आदी मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. किल्ले रायगड भेट, परिसरातील वाडी, वस्ती यांना भेट, मातीकाम भेट प्रात्यक्षिक, आदिवासी वाडीवरील मुलाखती यामुळे सहभागी विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण झाली. शिबिरात ११ विद्यार्थी, तीन शिक्षक सहभागी झाले होते.

### रमेश धनावडेंच्या पुस्तकास पुरस्कार



**अलिबाग :** कोकण मराठी साहित्य परिषदेचा संकीर्ण विभागातील प्रथम पुरस्कार रमेश प्रभाकर धनावडे यांच्या 'कवितेच्या सुरातून' या पुस्तकास जाहीर झाला आहे. पुढील आठवड्यात मालगुंड, रत्नागिरी येथे हा पुरस्कार मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात येणार आहे. या पुस्तकात त्यांनी सर्वच प्रतिथयश साहित्यिक-कवींना न्याय दिला आहे. आजवर त्यांचे मनतरंग काव्यसंग्रह, ऊर्मी चारोळी संग्रह, जीवनगाणे ललितलेख संग्रह, कवितेच्या सुरातून हा लेखसंग्रह ही पुस्तके प्रकाशित आहेत. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत.



**अलिबाग : दिवाळीसुट्टीनिमित्त मोठ्या संख्येने पर्यटक रायगड जिल्ह्यात येत आहेत. त्यामुळे अंतर्गत रस्त्यांवरदेखील वाहतूक कोंडी होत आहे.**

# आदिवासींच्या गावठाणाचा प्रश्न मार्गी लावणार

## निजापूरमधील मेळाव्यात आमदार भरत गोगावले यांचे आश्वासन

**माणगाव : प्रतिनिधी**

महाड विधानसभा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात आदिवासी समाज आहे. रक्षाबंधनाच्या दिवशी मला ८५०० बहिणींनी राख्या बांधल्या. त्यामध्ये ३००० आदिवासी बहिणी होत्या. आदिवासी बांधवाच्या सुखदुःखात व अडीअडचणीत आपण नेहमीच हात पुढे करतो. आदिवासींची संख्या वाढत असल्याने त्यांच्या गावठाणाच्या विस्ताराचा प्रश्नही निर्माण झाला आहे. निवडणुकीनंतर आपण त्यांच्या गावठाणाचा प्रश्न मार्गी लावू, असा विश्वास आमदार भरत गोगवले यांनी निजामपूर येथे व्यक्त केला.



आमदार भरत गोगावले यांच्या प्रचारार्थ शनिवारी (दि.९)निजामपूर येथे आदिवासी मेळावा पार पडला. या मेळाव्याला शिसवेना प्रवक्ते अ‍ॅड. राजीव साबळे, संपर्कप्रमुख अरुण चाळके, तालुकाप्रमुख अ‍ॅड. महेंद्र मानकर, निजामपूर सरपंच राजा रणपिसे, राष्ट्रवादी काँग्रेस नेते अनंता महाडिक, युवासेना उपजिल्हाप्रमुख अविनाश नलावडे, लक्ष्मण महाळुंगे, नथुराम वाघमारे, उमेश जाधव, दत्ताराम पवार, देहू हिलम, किसन जाधव, महायुती पदाधिकारी, कार्यकर्ते, आदिवासी बांधव, भगिनी उपस्थित होत्या.

या वेळी आमदार गोगावले पुढे म्हणाले की, आदिवासी बांधवांसाठी शबरी योजनेतून अनेक घरकुले मंजूर केली आहेत. आदिवासी बांधवांचा गावठाणाचा प्रश्नदेखील मार्गी लावण्यात येणार आहे. प्रत्येक बौद्धवाडीवर बौद्धविहार व आदिवासीवाडीवर समाजगृह बाधण्याचे काम सुरू आहे. निजामपूर विभागात औद्योगिकीकरण वाढविणे व त्यामध्ये स्थानिक पुत्रांना जास्तीत जास्त संधी देणे हा मानस असून तुम्ही काम करणाऱ्यालाच मत द्या, मी फक्त तुमच्याकडे पाच वर्षातून एक दिवस मागत असून पुढील पाच वर्षे आपला सेवेकरी म्हणून काम करेन असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते अनंता महाडिक, निजामपूर सरपंच राजा रणपिसे, यांच्यासह अनेक मान्यवरांनी महायुतीचे उमेदवार भरत गोगावले यांना प्रचंड मतांनी विजय करण्याचे आवाहन केले.

## धाटाव औद्योगिक वसाहतीत जलप्रदूषणमध्ये वाढ

### छुप्या पद्धतींने सोडतात रासायनिक पाणी

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील धाटाव औद्योगिक वसाहतीत अनेक रासायनिक कारखाने आहेत. येथील काही कारखाने छुप्या पद्धतीने कारखान्यातील दूषित पाणी नदीपात्रात सोडले जात आहे. त्यामुळे या जलप्रदूषणाविरोधात रोढ बुद्रुक येथील ग्रामस्थ राजेश डाके यांनी अशा कंपन्यांवर प्रदूषण नियंत्रण मंडळाने तत्काळ कडक कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.



धाटाव औद्योगिक वसाहतीमध्ये वायूप्रदूषणामुळे आजूबाजूच्या परिसरामध्ये नागरिकांना मोठ्या प्रमाणावर त्रास जाणवला होता. डोळ्याची चुरचुरणे, खोकला, घसा खवखवणे असे त्रास नागरिकांना जाणवत आहेत. त्यानंतर आता जलप्रदूषणात वाढ झाली आहे.

दिवसाढवळ्या रासायनिक कंपनीतून दूषित पाणी नदीपात्रात सोडल्याने पाण्याला उग्र वास येत होता. या पाण्यामुळे शेतीचे नुकसान होत आहेच, परंतु मुक्या जनावरांच्या जीवाशीसुद्धा खेळत सुरू आहे. त्यामुळे अशा कारखान्यांवर तत्काळ कडक कारवाई करावी, अशी मागणी राजेश डाके यांनी केली आहे.

## माथेरानमध्ये प्रचाराच्या तोफा अजूनही थंडावलेल्या

**माथेरान : प्रतिनिधी**

राज्यभरातील २८८ विधानसभा मतदारसंघांसाठी एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. प्रचारासाठी अवधी कमी मिळणार असल्याने सगळीच राजकीय मंडळी कामाला लागलेली दिसत आहेत, मात्र यामध्ये माथेरान शहर अपवाद ठरत असून याठिकाणी अजून तरी कोणत्याही उमेदवाराचा प्रचार सुरू झाला नसून माथेरान शहरात प्रचाराच्या तोफा अजूनही थंडावल्या आहेत.

कर्जत विधानसभा मतदारसंघात अनेक उमेदवार रिंगणात उतरले आहेत. यामध्ये मुख्य लढत ही दोन शिवसेनेत आणि एक अपक्ष उमेदवार यांच्यामध्ये असल्याचे बोलले जात आहे. शिवसेनेचे महेंद्र थोरवे तर शिवसेना उबाठा गटाचे नितीन सावंत आणि अपक्ष उमेदवार सुधाकर घारे यांच्यामध्ये खरी लढत असणार असल्याची चर्चा तालुक्यात रंगली आहे.

तिघांनीही आपल्या प्रचाराला सुरवात केली आहे, मात्र माथेरान पर्यटनस्थळी दिवाळी हंगाम सुरू असल्याने येथील सर्व आपल्या व्यवसायात गुंतली आहेत. आताचा विकेंड हा दिवाळी हंगामातील शेवटचा विकेंड असल्याने येत्या सोमवारपासून माथेरान शहरात प्रचाराच्या फेऱ्या सुरू होतील. त्यामुळे अजून तरी माथेरान शहरात प्रचाराच्या तोफा थंडावलेल्या दिसत आहेत.

माथेरान शहराची मतदारसंख्या जवळपास चार हजार इतकी आहे. विधानसभेसाठी दोन ते अडीच हजार इतके मतदान होते. इतके कमी मतदान होत असल्याने याठिकाणी उमेदवार आपला वेळ वाया घालवत नाहीत. अनेकदा सर्व जवाबदारी आपल्या कार्यकर्त्यांवर सोपवत असतात. माथेरान शहर हे एक जागतिक दर्जाचे पर्यटनस्थळ असल्याने येथील सगळे नागरिक आपआपल्या व्यवसायात गुंतलेले असतात. त्यामुळे माथेरान शहरात निवडणुकीची रणधुमाळी अजून तरी सुरू झालेली नाही.

## रोहा येथे ना. आदिती तटकरे यांच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन

**रोहे : प्रतिनिधी**

या विधानसभा निवडणुकीत आदिती तटकरे यांना ५० हजारांचे मताधिक्य देणार असे कार्यकर्ते बोलत आहेत. कार्यकर्ते जोमाने कामाला लागले आहेत. लाडकी बहीण योजनेसह वेगवेगळ्या योजना महायुतीच्या माध्यमातून सरकारने राबविल्या आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून अडीच कोटी महिलांना सहा महिन्यांत आदितीताईच्या माध्यमातून व महायुती सरकारच्या माध्यमातून थेट लाभ मिळाला आहे, असे प्रतिपादन माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी केले.

श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवार ना.आदिती तटकरे यांच्या निवडणूक संपर्क कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.



या वेळी राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे, जिल्हाध्यक्ष मधुकर पाटील, जिल्हा सरचिटणीस सुरेश मगर, माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, लालताप्रसाद कुशवाह, भाजप तालुकाध्यक्ष अमित घाग, राष्ट्रवादी शहराध्यक्ष अमित उकडे, भाजप शहराध्यक्ष यज्ञेश भांड, अप्पा देशमुख, महिला राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष प्रितम पाटील, राष्ट्रवादी शहर महिलाध्यक्ष प्राजक्ता चव्हाण, माजी नगरसेवक महेंद्र गुजर, महेश कोलाटकर, अहमद दर्जी, राजेंद्र जैन, महंमदशेठ डबीर, मयुर दिवेकर, नितीन पिंपळे, चंद्रकांत पार्टे, उत्तम नाईक, निलेश शिर्के आदी उपस्थित होते.

या वेळी सुरेश मगर यांनी, लोकसभा निवडणुकीत खासदार सुनील तटकरे यांना चांगले यश रोहा तालुक्यात मिळाले आहे. यापेक्षा जास्त मताधिक्य आदिती तटकरे यांना मिळणार असल्याचे सांगितले.

भाजप तालुकाध्यक्ष अमित घाग यांनी, श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघात महायुतीच्या उमेदवार आदिती तटकरे यांना लोकसभेपेक्षा विधानसभा निवडणुकीत मताधिक्य मिळणार असल्याचे सांगत पेण विधानसभा मतदारसंघात रवींद्र पाटील यांनाही आपण सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले. अमित उकडे यांनीही मनोगत व्यक्त केले.

## वडगाव शाळा आदर्शवत -पुनिता गुरव

### नवनियुक्त शिक्षकांची शाळेला भेट

**चौक : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील परिपूर्ण शाळा ही खालापूर तालुक्यात वडगाव येथे असून या शाळेला नवनियुक्त शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांनी आवर्जून भेट द्या. ज्यामुळे आपली शाळा घडवताना त्याचा फायदाच सर्व शिक्षकांना होईल, असे गौरवोद्गार राजिप शिक्षणाधिकारी पुनिता गुरव यांनी काढले.

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पनवेलच्या माध्यमातून राजिपच्या नवनियुक्त शिक्षकांच्या सक्षमीकरणासाठी नवनियुक्तशिक्षकांचे प्रशिक्षण सध्या के.ए.बांठिया पनवेल या ठिकाणी सुरू असून खालापूर, कर्जत, पनवेल, उरण व पेण या तालुक्यातील २२०पेक्षा जास्त शिक्षक या ठिकाणी गुणवत्ता व प्रशासनाचे धडे घेत आहेत.

राजिपच्या शिक्षणाधिकारी पुनीता गुरव व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य इरफान ईनामदार यांच्या निर्देशानुसार नवनियुक्त शिक्षकांना महाराष्ट्र मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा रायगड जिल्हा प्रथम पुरस्कार प्राप्त व मुंबई विभागीय द्वितीय क्रमांकाची मानकरी वडगाव शाळा भेटीचे नियोजन करून उत्कृष्ट शाळा कशी असावी याचा प्रत्यक्ष अनुभव दिला. या वेळी शिक्षकांना शाळाभेटीसाठी डाएटचे अधिव्याख्याता टोने यांनी मार्गदर्शन केले.

यासाठी तज्ज्ञ सुलभक मुख्याध्यापक सुभाष राठोड यांनी नियोजन केले, तर उस्मान शेख व मोहन दहिफळे यांनी शिक्षकांच्या भेटीसाठी प्रयत्न व मार्गदर्शन केले. गेले सहा दिवस शाळा कशी असावी हे आम्ही प्रशिक्षणात शिकलो त्याचे मुर्तीमंत उदाहरण म्हणजे वडगाव शाळा आहे. खूप खूप धन्यवाद ती संधी आपण आम्हाला दिलीत याचा फायदा आम्हाला आमच्या कारकिर्दीसाठी उपयुक्त होईल, असे पेण तालुक्यातील धावटे शाळेच्या उर्मिला तुकाराम कासार या नवनियुक्त शिक्षिका यांनी सांगितले.

इतक्या मोठ्या प्रमाणात शिक्षक आमच्या शाळेत आले,त्यांना शाळा आवडली व अशा पद्धतीने शाळा तयार करण्याची दृष्टी त्यांना मिळाली ही खूप मोठी गोष्ट आहे, असे मुख्याध्यापक सुभाष राठोड यांनी सांगितले.



## तीनविरा थांब्यावरून दोन जादा एसटी बस फेऱ्या मंजूर

**नागोठणे : बातमीदार**

तीनविरा थांब्यावर एमआयडीसी मार्गावर ज्यादा दोन एसटी गाड्या सुरू करण्याचे आश्वासन विभागीय नियंत्रकांनी दिल्यामुळे स्थानिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

अलिबाग-वडखळ महामार्गावर असलेला तिनविरा थांबा एसटी महामंडळाने जलद गाड्यांसाठीही मंजूर केला आहे, परंतु येथे जलद गाड्या थांबत नसत, तसेच एमआयडीसीच्या पेझारी-जलपाडा मार्गावर धावणाऱ्या गाड्याही एसटी महामंडळाने बंद केल्या होत्या. त्यामुळे दैनंदिन प्रवाशांची गैरसोय होत होती.

हा अन्याय दूर होण्यासाठी ज्येष्ठ नागरिक संस्था कामार्ले विभाग वाघोलीने ज्येष्ठ पत्रकार बळवंत वालेकर यांच्या नेतृत्वाखाली तीनविरा येथे रास्तारोको जाहीर केला होता. निवडणूक आचारसंहितेच्या काळात कायदा व सुव्यवस्था बिघडू नये म्हणून पोयनाडच्या सहाय्यक पोलीस निरीक्षकांनी यासंबंधी बैठक वाघोली व पोयनाड पोलीस ठाणे येथे घेतली.

बैठकीत तीनविरा थांब्यावर ट्रॅफिक पोलिसांची नेमणूक केली जाईल, तसेच एमआयडीसी मार्गावर ज्यादा दोन एसटी गाड्या दिल्या जातील असे एसटीचे विभागीय नियंत्रकांनी लेखी आश्वासन दिले. यमुळे प्रवाशांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले आहे.

## रेवदंड्यात महाविकास आघाडीचा प्रचार

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवार चित्रलेखा पाटील यांचा प्रचाराचा नारळ रेवदंड्याचे ग्रामदैवत मारुती मंदिर येथे शेकापचे नेते माजी आमदार जयंत पाटील यांच्या उपस्थितीत शनिवारी (दि.९) फोडण्यात आला.



या वेळी शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे, काँग्रेस चौल विभागीय अध्यक्ष अशोक आंबुकर, शेकापचे रेवदंडा ग्रामपंचायत माजी सरपंच सदाशिव मोरे, सोनाली मोरे, सदस्य संतोष मोरे, राजेंद्र वाडकर, सुरेश खोत, निलेश खोत, कबन नाईक, राजेंद्र चुनेकर, हेमंत गणपत, प्रमोद नवखारकर व पदाधिकारी शिवसेना ठाकरे पक्षाचे विभाग प्रमुख मारुती भगत, चौल उपसरपंच अजित गुरव, सदस्य जयवंत ठोंबरे पदाधिकारी काँग्रेसचे विभागीय खजिंदार सुगम आंबुकर, आशिष गोंधळी, सदस्य गोंधळी, नवाब तांडेल, संगीता महिमकर, कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

## आयुर्वेदिक चिकित्सा शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**कर्जत : प्रतिनिधी**

लायन्स क्लब ऑफ खोपोली आयोजित माजी आमदार तुकाराम सुर्वे यांच्या स्मरणार्थ तुकाराम सुर्वे प्रतिष्ठान, दादर-मुंबईतील ज्योविस आयुर्वेद, नारी सामाजिक संस्था यांच्या सहकार्याने अल्टा कंपनीच्या सभागृहात मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात २६२ रुग्णांची तपासणी करून त्यांना मोफत औषधे देण्यात आली.



या शिबिराचे उद्घाटन ज्योविस आयुर्वेदाचे डॉ. राज सातपुते यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून करण्यात आले. या वेळी डॉ. ज्योती सातपुते, लायन्स क्लबचे प्रकल्प प्रमुख जितेंद्र परदेशी, अरुण कासार, पहिले उपाध्यक्ष अविनाश राऊत, सेक्रेटरी शैली मेहता, खजिनदार चेतना केजरीवाल, निजामउद्दीन जळगावकर, बी. एस. म्हात्रे, अंकुश धाईगुढे, अजय पिल्लंई, प्रशांत साठे, रमेश पाटील, प्रदीप मेहता, राकेश ओसवाल, विलास नाईक, प्रतिष्ठानचे मुकेश सुर्वे, मनीषा सुर्वे, पद्मजा देशमुख आदी उपस्थित होते. जितेंद्र परदेशी यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

या शिबिरात डॉ. राज सातपुते यांच्यासह डॉ. भाग्यश्री भिसे, आयेशा वाडकर, सौरभ कुशवाह, कीर्ती तिवारी, प्रिय अरुणकुमार उमर वैश्या, कोमल सोलंके, ध्रुव दमानिया, रोहित जाधव, मिकी सिंग, रंजन पोतदार, अभय दुबे, दिव्या जोशी यांनी आरोग्य सेवा दिली. चामखीळ आणि भोवरी हे तत्काळ काढण्यात आले तर पित्त, पाठदुखी, वात, रक्त मोक्षण, आमवात, अग्निकर्म, लकवा आजाराचे रुग्णांची चिकित्सा करण्यात आली. बहिरेपणा, सांधेदुखी, कंबरदुखी, गुडघेदुखी आदी व्याधींवर उपचार करण्यात आले. या सर्व रुग्णांना मुंबई येथील नारी सामाजिक संघटना यांच्या माध्यमातून सर्व औषधे मोफत देण्यात आली.

## बॉर्डर-गावसकर मालिका

# पहिल्या कसोटीसाठी ऑस्ट्रेलियाचा संघ जाहीर

## युवा नॅथन मॅकस्विनीला संधी

**सिडनी : वृत्तसंस्था**

प्रतिष्ठेच्या आणि बहुचर्चित बॉर्डर-गावसकर मालिकेतील पर्थ येथे होणाऱ्या पहिल्या कसोटीसाठी ऑस्ट्रेलियाने संघ जाहीर केला आहे. डेव्हिड वॉर्नरच्या निवृत्तीनंतर उस्मान ख्वाजाच्या बरोबरीने सलामीवीर कोण असणार या संदर्भात उलटसुलट चर्चा सुरू होत्या. ऑस्ट्रेलियाच्या निवड समितीने नॅथन मॅकस्विनीला संधी देण्याचे ठरवले आहे.

ऑस्ट्रेलियाने १३ सदस्यीय संघाचीच घोषणा केली आहे. स्कॉट बोलँड आणि जोश इंगलिस हे राखीव खेळाडू असतील. मार्कस हॅरिस, सॅम कोन्टास यांची नावे सलामीवीराच्या भूमिकेसाठी चर्चेत होती, पण जॉर्ज बेली यांच्या नेतृत्वातील निवड समितीने मॅकस्विनीच्या नावाला पसंती दिली आहे. भारत अ संघाविरूद्धच्या लढतीत मॅकस्विनीला १४ आणि २५ अशा धावा करता आल्या, मात्र डोमेस्टिक क्रिकेटमधल्या सातत्यपूर्ण कामगिरीची दखल घेत त्याच्या नावाला प्राधान्य देण्यात आले आहे.



२५ वर्षीय मॅकस्विनीने ३४ प्रथम श्रेणी सामन्यात ३८.१६च्या सरासरीने २२५२ धावा केल्या आहेत. यामध्ये सहा शतके आणि १२ अर्धशतकांचा समावेश आहे. गरज पडल्यास तो फिरकी गोलंदाजीही करतो.

अष्टपैलू कॅमेरून ग्रीन दुखापतग्रस्त असल्याने निवड समितीने सहा फलंदाज, एक यष्टीरक्षक आणि चार गोलंदाज अशा पद्धतीने संघाची रचना केली आहे. वॉर्नरच्या निवृत्तीनंतर सलामीवीर म्हणून खेळलेला अनुभवी स्टीव्हन स्मिथ त्याच्या मूळ जागी अर्थात चौथ्या क्रमांकावर खेळणार आहे. उस्मान ख्वाजा, नॅथन मॅकस्विनी यांच्यासह मार्नस लबूशेन, ट्रॅव्हिस हेड, मिचेल मार्श फलंदाजीची धुरा सांभाळतील. ॲलेक्स कॅरी देशातील सर्वोत्तम यष्टीरक्षक फलंदाज आहे. त्यामुळे त्याची निवड होणे स्वाभाविक आहे असे निवड समितीने म्हटले आहे.

कर्णधार पॅट कमिन्स याच्यासह मिचेल स्टार्क, जोश हेझलवूड हे वेगवान गोलंदाजीचे आक्रमण सांभाळतील. गेली अनेक वर्ष हेच त्रिकुट ऑस्ट्रेलियाचा कणा झाले आहे. नॅथन लॉयन संघातला एकमेव फिरकीपटू असेल. राखीव गोलंदाज म्हणून स्कॉट बोलँड संघाबरोबर असेल. पाकिस्तानविरुद्धच्या वनडे मालिकेत प्रमुख खेळाडूंच्या अनुपस्थितीत संघाचे नेतृत्व करणाऱ्या जोश इंगलिसला पहिल्यांदाच कसोटी संघात स्थान मिळाले आहे. तडाखेबंद फलंदाजीसाठी प्रसिद्ध इंगलिसने ऑस्ट्रेलियाचे २५ वनडे आणि २६ टी-२० सामन्यात प्रतिनिधित्व केले आहे.

> **शिल्ड क्रिकेट स्पर्धेत मी सातत्याने चांगला खेळलो, त्याचे हे फळ आहे. माझ्या खेळात दररोज सुधारणा होते आहे. भारत अ संघाविरुद्ध खेळण्याचा अनुभव अनेक नव्या गोष्टी शिकवणारा होता. कसोटी क्रिकेटसाठी मी तय्यार आहे.**
> **-नॅथन मॅकस्विनी**

> **मॅकस्विनीकडे सलामीवीर म्हणून खेळण्याचा अनुभव एका सामन्यापुरता मर्यादित आहे, पण तो या भूमिकेला न्याय देऊ शकेल.**
> **-जॉर्ज बेली, निवड समिती अध्यक्ष**

# भारतीय संघ पाकिस्तान दौऱ्यावर जाणार नाही!

## बीसीसीआयने चॅम्पियन्स ट्रॉफीबाबत आयसीसीला कळवून टाकले

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पाकिस्तानात पुढील वर्षाच्या सुरुवातीला चॅम्पियन्स ट्रॉफी होणार आहे. या मालिकेसाठी भारतीय संघ पाकिस्तानला जाणार की नाही याबाबत संभ्रम होता. पाकिस्तानी माजी खेळाडू भारताला इशारे देत दबाव टाकण्याचा प्रयत्न करत होते. पीसीबीने तर भारताचे परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांची भेट घेतली होती. एवढे करूनही बीसीसीआयने भारतीय संघ पाकिस्तानला जाणार नाही, असे आयसीसीला कळवून टाकले आहे.

'ईएसपीएन क्रिकइन्फो'ने दिलेल्या वृत्तानुसार बसीसीसीआयने पीसीबीला याची माहिती दिली आहे. भारत सरकारने बीसीसीआयला आपली टीम पाकिस्तानात न पाठविण्याचा सल्ला दिल्याचे बीसीसीआयने म्हटले आहे. चॅम्पिअन्स ट्रॉफीमध्ये आठ संघ सहभागी होणार आहेत. याचे यजमानपद पाकिस्तानला मिळाले होते, परंतु भारताशिवाय या स्पर्धेला काहीच महत्व नाही हे पाकिस्तान आणि आयसीसीलाही माहीत होते. यामुळे अखेरच्या क्षणापर्यंत भारतावर दबाव टाकण्याचे काम पाकिस्तान करत होते. पाकिस्तानमध्ये श्रीलंकेच्या टीमवर दहशतवादी हल्ला झाला होता, ही बाब अद्याप क्रिकेटविश्व विसरू शकलेले नाही.

भारतीय संघ पाकिस्तानात खेळला तर पाकिस्तानी क्रिकेट बोर्डाला चांगली कमाई होणार होती. गेल्या काही वर्षांपासून उभयतांत स्पर्धा न झाल्याने पीसीबीचे प्रचंड नुकसान झाले आहे. यामुळे पाकिस्तानला भारतीय संघ पाकिस्तानात खेळताना हवा होता. याला भारताने स्पष्ट नकार दिला आहे.

भारताने पाकिस्तानात संघ पाठविण्यास नकार दिल्याने आता भारतीय संघाचे सामने हे हायब्रिड मॉडेलद्वारे राबविण्याशिवाय आयसीसी व पाकिस्तानकडे पर्याय राहिलेला नाही. भारताने यासाठी पसंतीचे ठिकाण दुबई असल्याचे म्हटले आहे. तर गेल्यावेळेप्रमाणे श्रीलंकेत हे सामने होऊ शकतात, परंतु अंतराच्या दृष्टीने युएई सोईचा असल्याचे सांगितले जात आहे.

# संजू सॅमसनने मानले कर्णधार आणि प्रशिक्षकाचे आभार



**दमदार पुनरागमन**

३० वर्षीय खेळाडूची श्रीलंकेविरुद्ध कामगिरी चांगली राहिली नव्हती, पण त्याने बांगलादेशविरुद्धच्या तिसऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात १११ धावा केल्या आणि त्यानंतर शुक्रवारी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध शतक झळकावले. वाईट काळात साथ दिल्याबद्दल केरळच्या फलंदाजाने कर्णधार सूर्यकुमार यादव आणि मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांचे आभार मानले.

**डर्बन : वृत्तसंस्था**

भारताचा युवा स्टार फलंदाज संजू सॅमसन याने डर्बनमध्ये शतक झळकावल्यानंतर मोठा खुलासा करत गौतम गंभीर आणि सूर्यकुमार यादव यांचे आभार मानले. त्याने कोच आणि कर्णधाराचे त्याच्या खेळीतील योगदान सांगितले.

भारताचा यष्टिरक्षक फलंदाज संजू सॅमसन म्हणाला की, आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सतत अपयशी ठरल्यामुळे सुरुवातीला त्याला त्याच्या क्षमतेवर शंका निर्माण होऊ लागली होती, पण कर्णधाराच्या आणि प्रशिक्षकाच्या पाठिंब्यामुळे तो दमदार पुनरागमन करू शकला. सॅमसनने शुक्रवारी डर्बनमध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या टी-२० सामन्यात ५० चेंडूत १०७ धावांची विस्फोटक फलंदाजी केली. या खेळीच्या जोरावर भारताने यजमान दक्षिण आफ्रिकेचा ६१ धावांनी पराभव करत मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.

सामन्यानंतर संजू सॅमसनने पत्रकार परिषदेत सांगितले की, माझ्या कारकिर्दीत मी अनेक अपयशांचा सामना केला आहे. मला वाटते जेव्हा तुम्ही अपयशातून जात, तेव्हा तुमच्या मनात अनेक शंका निर्माण होतात. यामध्ये सोशल मीडियादेखील नक्कीच भूमिका बजावते तसेच स्वत:बद्दल अनेक प्रश्न निर्माण होतात जसे की संजू, तू आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रिकेटसाठी बनला आहेस ना? आयपीएलमध्ये चांगली कामगिरी करत आहेस, तर तू आंतरराष्ट्रीय स्तरावर चांगली कामगिरी का करत नाहीस? असे अनेक प्रश्न माझ्या मनात निर्माण होत होते, पण इतक्या वर्षांच्या अनुभवानंतर मला कळले की मी काय करू शकतो.

संजू सॅमसन पुढे म्हणाला, जर मी क्रिजवर थोडा वेळ घालवला, तर माझ्याकडे फिरकी आणि वेगवान गोलंदाजांना शॉट मारण्याची क्षमता आहे. मला माहीत आहे की मी संघासाठी नक्कीच चांगले योगदान देऊ शकतो. मी सामना जिंकवून देऊ शकतो हेही एक वास्तव आहे. नक्कीच कारकीर्दीत बरेच चढ-उतार आले आहेत, परंतु वरची बाजूदेखील खरोखर चांगली आहे. तेच मी स्वतःला सांगत राहिलो.

# तिसऱ्या वनडेत 'कांगारूं'चा १४० धावात खुर्दा

**पर्थ : वृत्तसंस्था**

भारताविरूद्धच्या प्रतिष्ठेच्या बॉर्डर गावसकर मालिकेसाठी ऑस्ट्रेलियाने पाकिस्तानविरुद्धच्या तिसऱ्या वनडेत प्रमुख खेळाडूंना विश्रांती देण्याचा निर्णय घेतला, मात्र हा निर्णय यजमानांच्या अंगलट आला आहे, कारण पाकिस्तानच्या भेदक गोलंदाजीसमोर ऑस्ट्रेलियाचा डाव १४० धावांतच गडगडला आहे. त्यानंतर पाकने आठ गडी राखून सामना व मालिकाही जिंकली.



पाकिस्तानचा संघ ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर आहे. पहिल्या आणि दुसऱ्या वनडेत ऑस्ट्रेलियाने पूर्ण ताकदीचा संघ खेळवला, मात्र बॉर्डर-गावसकर मालिका लक्षात घेऊन तिसऱ्या सामन्यात प्रमुख खेळाडूंना आराम देण्याचा निर्णय घेण्यात आला. कर्णधार पॅट कमिन्ससह, मिचेल स्टार्क, जोश हेझलवूड, मार्नस लबूशेन आणि स्टीव्हन स्मिथ यांना तिसऱ्या वनडेसाठीच्या संघातून विश्रांती देण्यात आली. विकेटकीपर फलंदाज जोश इंगलिसकडे कर्णधारपद सोपवण्यात आले. प्रमुख खेळाडूंच्या जागी कूपर कोनेली, मार्कस स्टॉइनस, स्पेन्सर जॉन्सन, लान्स मॉरिस, शॉन अबॉट यांना संघात घेण्यात आले.

बॉर्डर-गावसकर मालिकेचा पहिला कसोटी सामना ज्या मैदानावर होणार आहे त्याच पर्थच्या खेळपट्टीवर यजमान 'कांगारूं'ची दाणादाण उडाली. पाकिस्तानने खेळपट्टीचा नूर ओळखून नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला.

### पाकिस्तानने सामन्यासह मालिका जिंकली

धडाकेबाज फलंदाजीसाठी प्रसिद्ध जेक फ्रेझर मॅकगर्क सात धावा करून तंबूत परतला. कर्णधारपदाची जबाबदारी मिळालेला इंगलिसही मोठी खेळी करू शकला नाही. त्याने सात धावा केल्या. हारिस रौफने शॉर्टला तंबूत परतावले. दुखापतीमुळे कोनेलीला मैदान सोडावे लागले.

अनुभवी ग्लेन मॅक्सवेल आणि मार्कस स्टॉइनस यांच्याकडून ऑस्ट्रेलियाला मोठ्या खेळीची अपेक्षा होती, पण रौफच्या चेंडूवर मॅक्सवेल फसला. त्याला भोपळाही फोडता आला नाही. मोहम्मद हसनैनने स्टॉइनसला बाद केले. त्याने ८ धावा केल्या. ८८/६ अशी अवस्था झालेल्या ऑस्ट्रेलियाचा डाव शॉन अबॉट आणि ॲडम झंपा यांनी सावरला. नसीम शहाने झंपाला बाद करत ही भागीदारी तोडली. त्याने १३ धावा केल्या. अबॉटने बाद होण्यापूर्वी ३० धावांची खेळी केली.

पाकिस्तानतर्फे शाहीन शहा आफ्रिदी आणि नसीम शहा यांनी प्रत्येकी तीन विकेट्स घेतल्या. हारिस रौफने दोन, तर हसनैनने एक गडी बाद केला. अवघ्या ३१.५ षटकात ऑस्ट्रेलियाचा डाव १४० धावांतच संपुष्टात आला. प्रत्युत्तरात पाकिस्तानने २६.५ षटकात दोन गडी गमावून सामना जिंकला.

# विजय निसटल्याची खंत -सुलक्षण कुलकर्णी

**पुणे : प्रतिनिधी**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धा आता मध्यावर आली असून सातपैकी चार साखळी सामने खेळून झाले आहेत. त्यामुळे सेनादलाविरुद्ध विजय निसटल्याची खंत निश्चितच आहे. हा सामना जिंकून गुणतालिकेतील स्थान भक्कम करण्याची आम्हाला संधी होती, मात्र निराशाजनक पराभव पत्करावा लागल्याचे महाराष्ट्राचे मुख्य प्रशिक्षक सुलक्षण कुलकर्णी यांनी म्हटले आहे.

गहुंजे येथे झालेल्या सामन्यात महाराष्ट्राला सेनादलकडून ३५ धावांनी हार पत्करावी लागली.



'आमच्यासाठी हा सामना खूप महत्त्वाचा होता. आम्हाला विजयाचे सहा गुण मिळवता आले असते, तर गुणतालिकेत आम्ही आणखी चांगल्या स्थितीत पोहचू शकलो असतो. खेळाडूंचा आत्मविश्वासही खूप उंचावला असता. त्यामुळे विजय आमच्या हातून निसटल्याची खंत आहे,' असे मुंबईचे माजी रणजीपटू असणारे कुलकर्णी म्हणाले.

**बाद फेरीचा मार्ग खडतर**

*अखेरच्या दिवशी महाराष्ट्राला २८७ धावांची गरज होती आणि सात गडी शिल्लक होते. आपला संघ विजयी लक्ष्य गाठू शकेल असा प्रशिक्षकांना विश्वास होता. 'एक-दोन भागीदाऱ्या आघाडीच्या फळीतील फलंदाजांमध्ये झाल्या असत्या, तर विजय आमचाच होता, मात्र एकंदरीत आम्ही जसा खेळ केला त्याचा मला अभिमान आहे,' असे कुलकर्णी यांनी नमूद केले. आमचा बाद फेरीचा मार्ग खडतर झाला आहे. आम्हाला उर्वरित तीन सामने जिंकण्यावाचून पर्याय नाही, असेही ते म्हणाले.*

# भारताला क्लीन स्वीप केलेल्या न्यूझीलंडचा पराभव

## श्रीलंकेने पहिला टी-२० सामना जिंकला

**दांबुला : वृत्तसंस्था**

दोन सामन्यांच्या टी-२० मालिकेतील पहिला सामना श्रीलंका आणि न्यूझीलंड यांच्यात दांबुला येथे खेळला गेला, ज्यात यजमान संघाने चार विकेट्सने विजय मिळवला. पहिल्या डावात खेळताना न्यूझीलंडचा संघ १९.३ षटकात १३५ धावांवर सर्वबाद झाला. प्रत्युत्तरात श्रीलंकेच्या संघाने सहा चेंडू बाकी असताना सहा गडी गमावून हे लक्ष्य गाठले. चारिथ असलंकाला त्याच्या उत्कृष्ट खेळीसाठी सामनावीर म्हणून गौरवण्यात आले.

मिचेल सँटनरने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, जो संघासाठी चुकीचा ठरला. न्यूझीलंडचे फलंदाज सुरुवातीपासूनच दडपणाखाली दिसले. न्यूझीलंडचा संघ संपूर्ण षटक खेळू शकला नाही आणि १९.३ षटकांत १३५ धावांवर त्यांचा डाव आटोपला.



लक्ष्याचा पाठलाग करताना यजमान संघाची सुरुवातही चांगली झाली नाही. श्रीलंकेची पहिली विकेट ३२ धावांवर पडली. यानंतर पथुम निसांका आणि कुसल परेरा यांच्यात ४० धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी झाली. कर्णधार चारिथ असलंकाने २८ चेंडूत नाबाद ३५ धावांची खेळी केली. श्रीलंकेने एक षटक शिल्लक असताना सहा गडी गमावून आव्हान गाठले.

# थायलंडमध्ये धोनीचा 'कूल' मूड

**बँकॉक : वृत्तसंस्था**

धोनी सध्या कुटुंबीयांसह भटकंती करत आहे. त्याची लेक झिवा धोनीने याची झलक शेअर केली आहे. भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनी सोशल मीडियाच्या या जगात सोशल मीडियापासून दूर असतो, पण त्याची पत्नी साक्षी धोनी सोशल मीडियावर फार सक्रिय असते. ती नेहमी नवनवीन फोटो, व्हिडीओ पोस्ट करून चाहत्यांचे लक्ष वेधत असते. याशिवाय साक्षीच चाहत्यांना आपल्या लाडक्या माहीची झलक दाखवत असते.

सध्या क्रिकेटच्या विश्वापासून दूर असलेला धोनी थायलंडमध्ये आपल्या कुटुंबासह सुट्टीचा आनंद घेत आहे. क्रिकेटमधून ब्रेक घेत धोनी सध्या कुटुंबासोबत निवांत क्षण घालवत आहे. त्याची मुलगी झिवा हिच्या इन्स्टाग्रामवर एक फोटो शेअर करण्यात आला आहे, ज्यामध्ये धोनी टी-शर्ट घालून समुद्राच्या पाण्यात उभा आहे. त्याची पत्नी साक्षी गुलाबी स्विमसूटमध्ये किनाऱ्यावर उभी असल्याचे दिसते.



आयपीएल आपल्या आगामी हंगामाकडे कूच करत आहे. चेन्नई सुपर किंग्जने कायम ठेवलेल्या पाच खेळाडूंमध्ये माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनीचा समावेश आहे. चाहत्यांना सर्वांत मोठा दिलासा धोनीच्या रूपाने मिळाला आहे. गेल्या सत्रापासून तो पुढच्या सत्रात खेळणार नसल्याच्या अफवा पसरल्या होत्या, पण माहीने खेळण्याचा निर्णय घेतला. चेन्नईने धोनीला 'अनकॅप्ड खेळाडू म्हणून चार कोटी रुपये दिले. बीसीसीआयच्या नव्या नियमानुसार धोनी हा आयपी

# जॅन झेलेझनी नीरज चोप्राचे नवे प्रशिक्षक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

यंदाच्या वर्षी पॅरिस येथे झालेल्या ऑलिम्पिक स्पर्धेत भारताचा स्टार भालाफेकपटू नीरज चोप्राने रौप्य पदक जिंकून आगामी नवीन हंगाम सुरू होण्यापूर्वी आता मोठा निर्णय घेतला आहे. नीरजने चेक प्रजासत्ताकच्या जॅन झेलेझनी यांची नवीन प्रशिक्षक म्हणून निवड केली आहे. झेलेझनी तीन वेळा ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकण्यात तसेच तीनदा विश्वविजेतेपद पटकावण्यातही यशस्वी ठरले आहेत, ज्यामध्ये ९८.४८ मीटर अंतरावर भालाफेक करण्याचा विश्वविक्रमही त्यांच्या नावावर आहे.



याआधी जर्मन बायोमेकॅनिक्स तज्ज्ञ क्लॉस बारटोनिट्झ नीरज चोप्रासाठी त्यांच्या वैयक्तिक प्रशिक्षकाची भूमिका बजावत होते. जर आपण जॉन झेलेझनी यांच्याबद्दल बोलायचे झाले तर त्यांनी १९९२, १९९६ आणि २०००मध्ये झालेल्या ऑलिम्पिक गेम्समध्ये पदके जिंकली आहेत. १९९३, १९९५ आणि २००१मध्ये जागतिक विजेतेपद पटकावण्यातही ते यशस्वी ठरला होते. झेलाझनी हे आधुनिक युगातील महान भालाफेक करणारे म्हणून ओळखले जातात, तर नीरज चोप्राने यंदाच्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये रौप्यपदक जिंकले. त्याआधी तो टोकियो ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकण्यात यशस्वी ठरला होता. झेलेझनी यांची प्रशिक्षकपदी नियुक्ती केल्यानंतर नीरजने आनंद व्यक्त केला आहे.

> **मी सुरुवातीपासूनच जॉन झेलेझनी यांच्या तंत्राचा आणि अचूकतेचा चाहता आहे. मी त्यांचे अनेक व्हिडीओ पाहिले आहेत. अनेक वर्षांपासून ते या खेळात अव्वल आहेत. त्यांना खूप अनुभव आहे. आता मी माझ्या करिअरच्या पुढच्या टप्प्यात जात असताना जॉनचा पाठिंबा मिळणे ही माझ्यासाठी खूप मोठी गोष्ट आहे आणि मी त्यांच्यासोबत काम करण्यास खूप उत्सुक आहे.**
> **-नीरज चोप्रा**

> **मी खूप वर्षांपूर्वी सांगितले होते की, नीरजमध्ये महान खेळाडू बनण्याचे सर्व गुण आहेत आणि जर मला चेक प्रजासत्ताकाबाहेरच्या खेळाडूला प्रशिक्षण द्यायचे असेल तर नीरज माझी पहिली पसंती होती.**
> **-जॉन झेलेझन**

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com